# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००२ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | १० |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ६१**

MAHMAR 19358/13/1/2000-TC



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक १० / सप्टेंबर २००२

## संपादकीय

### योगेश तुझा आम्हाला अभिमान आहे

आजच्या गतिमान आणि जाहिरातीच्या युगात 'माध्यमे' ही एक विलक्षण गोष्ट ठरलेली आहे. एखादा गंभीर प्रश्न किती वाजत-गाजत ठेवायचा, एखादा किरकोळ प्रश्न कसा वेशीवर टांगायचा आणि सामान्य माणूस नावाचा जो नागरिक आहे त्याची कशी दिशा भूल करायची ही सर्व तंत्रे माध्यमातील लोकांना अवगत असतात. माझ्या दृष्टीने जे महत्त्वाचे आहे ते तुझ्या दृष्टीने असेलच असे नाही. ही व्यक्तिसापेक्षता माध्यमांना मान्य नाही. माध्यमे दाखवतील, छापतील ते सर्व खरे! त्या वृत्तांना इतर काही परिमाणे असू शकतात याचा विचार करण्याची क्षमताच नाहीशी केल्याने पेपरवाले, टी. व्ही. वाले त्यांच्या चष्म्यातून सामान्यांना जग दाखवत रहातात.

यामुळे अनेक चांगल्या घटनांना स्थानच दिले जात नाही. जगात जे काही चालले आहे ते मूल्यांवरील विश्वास उडवायला लावणारे आहे असा समज वळावत चालला आहे. हेड लाईनची व्हावी अशी चांगली बातमी आत कोपऱ्यात 'एडिट' करून टाकायची आणि त्यात तथ्य नाही असे काही तिखट मीठ लावून हेड लाईनचे करून टाकायचे.

या आजच्या माध्यमवाल्यांच्या मानसिकतेच्या पार्श्वभूमीवर एक धाडसाची, चांगली बातमी मुद्दाम सांगावीशी वाटते. ती आमच्या संस्थेच्या कला वाणिज्य महाविद्यालयातील अकरावी कला या वर्गात शिकणाऱ्या योगेश (रोल नंबर ३६५१) या विद्यार्थ्यांच्या धाडसाची! १३ ऑगस्ट रोजी गोव्याला त्याच्यातोर समुद्र किनाऱ्यावर निसर्गाचे रौद्र रुप पाहताना एका दांपत्याच्या हातून त्यांचे आठ महिन्यांचे बाळ समुद्रात पडलेले योगेशने पाहिले. त्याला वाचवण्यासाठी समुद्रात उडी घेतलेले आई व बाबा योगेशने पाहिले व जीवाची पर्वा न करता सागरात उडी मारून योगेशने बाळाला वाचवले. आईला वाचवायला मदत केली. असे तरुण आपल्यात असतात. विलक्षण जिद्दीने चांगले काम करतात. प्रसिद्धी माध्यमे त्यांची म्हणावी तशी दखल घेताना दिसत नाहीत.

केवळ परिसर वार्तात दखल घ्यावी अशी ही घटना नाही तर खास संपादकीयात स्थान द्यावे असे हे धाडस! स्वातंत्र्य दिनी माननीय डॉ. वा. ना. बेडेकरांच्या हस्ते योगेशचा गौरव झाला व त्यातून आम्हाला आमच्या विद्यार्थ्यांबद्दल वाटणाऱ्या भावना व्यक्त झाल्या. असे योगेश हीच आमची आशा आहे! योगेश तुझे खास अभिनंदन!!

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक १० / सप्टेंबर २००२

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टस,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१
५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संस्कृत सुभाषिते | डॉ. मो. दि. पराडकर | ३ |
| २) | अखिल मानवाना अमरतेचे दर्शन घडविणारी वीरांगना | श्री. शं. बा. मठ | ५ |
| ३) | साहित्य - जगत | श्री. शरद जोशी | १७ |
| ४) | सार्वजनिक ग्रंथालय कायद्यातील बदल-काही अपेक्षा | अरुणा विचारे | १९ |
| ५) | श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय ६ वा) ॥ ध्यानयोगः ॥ | आशा भिडे | २१ |
| ६) | 'कहाणी तंबाखूची' | गीतेश गजानन शिंदे | २९ |
| ७) | प्रकल्पांची यादी | | ३२ |
| ८) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३५ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संस्कृत सुभाषिते

संस्कृत सुभाषितांमधील काव्य, जीवनाचे तत्त्वज्ञान यांचे महत्व काही वेगळेच असते. 'दिशा'च्या वाचकांकरिता अशी काही संस्कृत सुभाषिते अंकात देण्याचे योजले आहे. - संपादक

१) सहते शरशातघातान् अश्वः कदापि नैव कशाम्।
सहते विपत्सहस्रं मानी नैवापमानलेशा मपि ॥१॥

२) सम्प्राप्तमनमानं यस्तेजसा न प्रमार्जति।
कस्तस्य पौरुषेणार्थो महताप्यल्पचे तसः ॥२॥

३) यथा खरः चंदनभार वाही भारस्य वेत्ता न तु चन्दनस्य
एवं हि शास्त्राणि बहूजन्यधीत्म अर्थेषु मूढाःखरवद वहन्ति ॥३॥

४) मुकुटे रोपिनः काचः चरणाभरणे मणिः ।
न हि दोषो मणेरस्ति किंतु साधोरविज्ञता ॥४॥

५) वरं दरिद्रः श्रुतिशास्त्रपारगो न चापि मूर्खो बहरत्नसंयुतः।
सुलोचना जीर्णपटापि शोभते न नेत्रहीना कनकैरलङ्कृता॥ ५॥

६) आवज्ञात्रुटितं प्रेम नवीकर्तुं क ईश्वरः।
सन्धिं न याति स्फुटितं लाखालेपेन मौडक्तिकम् ॥६॥

१) युद्धभूमीवरील रथाच्या जातिवंत घोड्याचे उदाहरण या सुभाषिताच्या पहिल्या ओळीत घेतले. असा घोडा युद्धात 'शरशात' म्हणजे शेकडो बाणांचे आघात सहन करतो परन्तु 'कशान्' म्हणजे चाबकाचे फटकारे त्याला सहन होत नाहीत, कारण रथाच्या मालकाने चाबूक वापरावा हा त्याला स्वतःचा अपमान वाटतो, उमेदपणाला कलंक लागला अशी त्याची भावना होते. उमद्या घोड्याची गति हे त्याचे भूषण आणि चावकाचा फटकारा म्हणजे गतिहीनतेचा पुरावा. हाच मानवंतांचा स्वभाव हे दुसऱ्या ओळीत स्पष्ट केले. मानी माणूस अनेक, क्रमशः शेकडो आपत्ती आल्या तरी परवा करत नाही; अपमान मात्र जरासुद्धा त्याला सहन होत नाही. तो त्याला कलंक वाटतो. 'सहस्र व्याधी सोशिल मानी। परन्तु न अपमान जरां' हे स्वाभाविकच नव्हे का ?

२) मानी मनुष्याचा जरा अपमान झाला तर त्याची प्रतिक्रिया कोणती हे या श्लोकात सांगितले. झालेला अपमान शक्य तितक्या लवकर आपल्या अंगभूत तेजाने पुसून टाकणे नव्हे धुवून टाकण्याची तो संधी शोधत असतो. जर हे त्याने केले नाही (न प्रमार्जति) तर मग त्याचे पौरुष काय कामाचे ? हा पुरुषार्थ नव्हे आणि असला तरी क्षुद्रपणाचेच ते लक्षण. 'मोठा जरी पुरुषार्थ तयाचा' तरी हि 'क्षुद्र च परि तो भासतसे.' हा नुसता गुणवत्तेचा प्रश्न नाही. मूल्यवत्ता महत्त्वाची 'बूँद से गई वह हौद से नहीं आती' हेच खरे.

३) भार वाहणे म्हणजे मर्म समजणे नव्हे किंवा मूल्य जाणणे नव्हे. खर म्हणजे गाढव चंदनाच्या लाकडांची मोळी वहात असेल परंतु त्याला समजते ते वजनच, सुगन्धाचे त्याला कुठले भान ? शास्त्राच्या पदव्यांचा भार वाहणारे मूर्ख लोक या गाढवा सारखेच असतात. पदव्या त्यांच्याजवळ भरपूर परन्तु ज्या शास्त्रांमधल्या पदव्या त्यांनी मिळवल्या त्यांचा गार्भितार्थ त्यांना माहीत नसतो. असे जर असले तर पदव्यांचा भार आणि गाढवाच्या पाठीवरल्या चंदनाच्या लाकडांचे ओझे यात फरक नाही. गार्भितार्थ माहीत नसणे म्हणजे शब्दार्थाचे ओझे वाहण्यासारखे आहे. हे लक्षात घेऊन सुश्रुताने शास्त्रपठनापेक्षा त्याच्या

क्रियाकारित्वावर, प्रयोगावर भर दिलेला आहे. परक्यांची विरुदे वाहण्यापेक्षा शास्त्रवचनांचे मर्म जाणणे अधिक महत्त्वाचे .

४) साधने चांगली असली तरी त्याचा योग्य ठिकाणी वापर जर केला नाही तर साधनाबद्दल तक्रार करण्यात, त्यांना बोल लावण्यात अर्थ नाही. मुकुटात काच बसवली आणि पैंजणात मणी बसविला तर त्यात मण्याचा दोष नाही वापर करणाऱ्याचा म्हणजे कारागिराचा तो अडाणीपणा. याला 'साधु' हा शब्द श्लोकात वापरला. यामुळे 'अविज्ञता' अधिक उठून दिसते. 'कनकभूषणसंग्रहणाचितो मणिः' जर शिशात घातला तर त्याचा आवाज येत नाही आणि तो शोभतही नाही कारण याची जबाबदारी योजना करणाऱ्यालाच स्वीकारावी लागते, असे एका दुसऱ्या सुभाषितात म्हटले त्याची इथे आठवण झाल्यावाचून रहात नाही. या श्लोकात अडाणीपणाची दोन उदाहरणे पहिल्याच ओळीत घेतलेली दिसतात.

५) श्रुती म्हणजे वेद आणि शास्त्रे यात पारंगत माणूस म्हणजे पंडित दरिद्री असला तरी चांगला, तो शोभून दिसतो, तो परवडला परंतु सुवर्णालंकारांनी मढवलेला असला तरी मूर्ख नको, त्याचे तेज पडत नाही. याला व्यवहारातले उदाहरण दुसऱ्या ओळीत घेतलेले आहे. सुलोचना म्हणजे सुंदर डोळे लाभलेली स्त्री विरलेले, जीर्ण वस्त्रे म्हणजे फटकुर नेसली तरी शोभून दिसते. आणि सर्व तऱ्हेच्या सुवर्णालंकारांनी (कनकैः) नटलेली असली तरी ती स्त्री जर नेत्रहीन म्हणजे आंधळी असेल तर शोभून दिसणार नाहीच, किंबहुना ते एक शल्य मानावे लागेल. अलंकारांनी सौन्दर्य निर्माण होत नाही. त्याचप्रमाणे मूर्खांजवळ अनेक रत्ने असली तरी त्याची दरिद्री पंडिताशी तुलना होऊ शकत नाही. 'वरं-न' या रचनेचा उपयोग संस्कृतमध्ये नेहमी केला जातो. वर मेको गुणी पुत्रो न च मूर्खशतान्यपि' ही उक्ती प्रसिद्धच आहे.

६) या श्लोकात सुभाषितकाराने जीवनातले एक सत्य अगदी सहजपणाने सांगून थोडक्यात भरपूर अर्थ व्यक्त करण्याच्या सुभाषिताच्या शक्तीची कल्पना आणून दिली. अवज्ञेमुळे अपमानामुळे जर प्रेम म्हणजे मैत्री तुटली तर मग नव्याने ती जोडणे कुणाला शक्य आहे ? दुसऱ्या ओळीतले उदाहरण उत्तमच आहे. मौक्तिकम् म्हणजे मोती जर तुटला किंवा फुटला तर लाखेच्या लेपात तो सांधण्याची शक्ती नसते. मैत्रीची तुलना मोत्याशी करण्यातले औचित्य सहज समजण्यासारखे आहे. अपमानाची तुलना लाखेच्या लेपाशी करून सुभाषितकाराने बहार केली. तडकलेली काच आणि अवज्ञेमुळे तुटलेली मित्रता सारखीच. ती नव्याने जोडणे फुकट आहे. याचा अनुभव आल्यावाचून रहात नाही. अशा सुभाषितांचे सामर्थ्य वादातीतच आहे.

डॉ. मो. दि. पराडकर

□□□

दिशा

आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवा.

संपादक

# अखिल मानवाना अमरतेचे दर्शन घडविणारी वीरांगना

(श्री. अरविंद यांच्या 'सावित्री' या महाकाव्याच्या आधारे)

*सावित्री सत्यवानाची कथा आपणा सर्वांना माहीत असते. या कथेचे महाकाव्य करताना श्री. अरविंदांनी सावित्रीच्या माध्यमातून जे तत्त्वज्ञान सांगितले ते महान होते. श्री. अरविंदांच्या महाकाव्यावर आधारित हा विचार लेख. संपादक*

## सावित्री उपाख्यान

ही कथा मार्कंडेय ऋषींनी राजा युधिष्ठिर याला कथन केली आहे. युधिष्ठिराची मानसिक उद्विग्नता घालवण्यासाठी पूर्वकालीन उदाहरण म्हणून ही कथा त्याला सांगण्यात आलेली आहे. महाभारतात ही कथा फक्त सातशे ओळींत सांगितलेली आहे. श्री अरविंदानी त्यावर चोवीस सहस्र पंक्तीचे काव्य लिहिले आहे. हे लिहीत असताना श्री अरविंदानी पौराणिक कथेचे परिवर्तन एक रुपकात्मक कथेत केल आहे.

जेव्हा सारे विश्व अज्ञान अंध:कारात वाहून गेलेले असते त्याच वेळी एखादा स्थितप्रज्ञ पुढे अवतरणाऱ्या प्रकाशाची पहाट वाहत असतो. सूर्य क्षितिजावर पदार्पण करण्यापूर्वीच तो त्याला स्तुती स्तोत्राने आळवतो आणि अर्घ्य प्रदान करतो. श्री अरविंदानी सावित्रीला भव्य उष:काळाचे रुपक दिले आहे. नवीन जाणिवेची ही उषा मानवाला मनातीत व्हावयास लावते आणि त्याला अडचणींत टाकणाऱ्या अनेक समस्यांचा ती उलगडा करते. मनाच्या मर्यादित पणामुळेच ज्या काही गोष्टींचा उलगडा होत नसतो त्या ती करून देते. अश्वपतीच्या अशा प्रकारच्या जाणिवेची भटकंती चाललेली दाखविण्यात आलेली आहे. सावित्रीचा जन्म म्हणजे सगळ्या संकल्पांची सिद्धी, नूतन उषेची येणारी पाउले, नवीन जाणिवेचे अवतरण. श्री.अरविंद सांगतात ती बळे आणता येत नाही. ईश्वरी कृपेप्रमाणे अवतरण व्हावे लागते.

हे अवतरण केव्हा घडते? मानवी प्रयत्न निष्फळ आहेत काय ? मानव किती मर्यादे पर्यंत वाटचाल करू शकतो. कोणत्या ठिकाणी त्याला थांबणे भाग पडते ? या साऱ्या प्रश्नांचा उलगडा सावित्री काव्यात करण्यात आलेला आहे. मानवाचा हा प्रवास अंधरातून जरी असला तरी उष:काल निश्चित होत असल्याची खात्री आहे. ही निश्चितता हा या काव्यातील मूळ गाभा आहे. या काव्याची सुरुवात आणि शेवट उष: काळाच्या अनुरोधानेच केलेली आढळते. सत्यवानाचा मृत्यू या कथेभोवती गुंडाळलेला पट आहे. महाभारतातील कथेत सत्यवानाच्या मृत्यूच्या आदल्या दिवसाची रात्र ही काळीकुट्ट होती असे म्हटले आहे. याचा नेमका अर्थ काय ? सावित्री कोण ? सत्यवान कोण ? त्याचा मृत्यू, या घटनांचा नेमका अर्थ काय ? हे सारे शून्याचा विचार करण्यासारखे आहे. याचे महत्त्व काय? हे शून्यच सर्व निर्मितीचे बीज असले काय ? मग तिच्या गर्भात दडलेल्या बीजाचे आविष्करण कशा प्रकारचे असेल? या गोष्टींचा उलगडा होण्यासाठी श्री. अरविंदानी कथन केलेल्या सावित्री कथेकडे वळावे लागेल.

## विज्ञान आणि आत्मज्ञान

आजचे युग हे बुद्धिनिष्ठ आहे. त्यामुळे अखंड साहसपूर्ण शोध लावले जात आहेत. खरोखरच ही संस्कृती बुद्धीच्या उन्नयनाचे आणि अवनतीचे एकाच वेळी दर्शन घडविते. बाह्य विश्वात मानव भराऱ्या मारत आहे आणि अंतर जाणिवेच्या आकाशात तो एखाद्या पाहुण्यासारखा

बुजरा झाला आहे. अंतर्विश्वावर स्वामित्व प्रस्थापित न करता होणारे बहिर्गमन हे केवळ स्वार्थ साधण्यासाठी उपयुक्त ठरेल. विज्ञान आत्मज्ञानास जोडले गेले नाही तर मानवापुढे केवळ अंधार असेल. पण हे काम केवळ बुद्धीच्या बळावर करता येणार नाही. कारण अंर्तज्ञानाची त्याला ओळख असणार नाही. अंतःस्फुरणातून दिव्य तेजाच्या अवतरण्याने हे शक्य होईल. यासाठी स्वर्ग आणि पृथ्वी यांचे मिलन झाले पाहिजे पृथ्वीवरील जाणिवेला दैवी स्पर्श समजेल आणि हे होणे आज तरी अत्यंत अगत्याचे आहे.

## जाणीव

या जाणिवेचा विचार करताना ती दोन प्रकारची आढळते. एक पुरुष प्रवृत्तीची व दुसरी स्त्री प्रवृत्तीची. आज आपली जाणीव पुरुष प्रवृत्तीची आहे. त्यामुळे संघर्ष, युद्ध, वेगळेपणाचा भाव या गोष्टी जास्त आढळतात. आम्ही आज एका वैभवाच्या अत्युच्च शिखरावर उभे असलो तरी आतून भयानक दरी निर्माण केलेली आहे. या पासून वाचावयाचे झाल्यास मानवाच्या ठिकाणी स्त्री प्रवृत्तीची जाणिवही निर्माण होणे आवश्यक आहे. या उभयविध जाणिवेच्या सान्निध्यामुळेच आपण शास्त्र म्हणजे विज्ञान व अध्यात्म म्हणजे आत्मज्ञान जवळ करू शकू. सावित्रीचा जन्म म्हणजे स्वर्गीय देणं आहे. हे ओळखले पाहिजे. तरच स्वर्ग आणि पृथ्वी यांचे एकत्व प्रस्थापित होईल. तरच भौतिक आणि आध्यात्मिक विचार एकत्र वाहू लागतील. म्हणजे पुरुष आणि स्त्री प्रवृत्तीच्या जाणिवांचे मिलन होऊ शकेल.

## सावित्रीचे चित्रण

तिचे चित्रण मानवाने आपल्या मनाने बनविले आहे. परंतु सावित्री हे एक रुपक म्हणजे साक्षात धरती आणि आकाश यांचे मीलन आहे. जीवनाकडे पाहण्याचा जाणीव पूर्वक दृष्टीकोन हा उत्क्रांतीचा आहे. उच्च मन, प्रभावित मन, अंतर्मन, उन्मन, श्रेष्ठमन ही सारी या काव्यात फार सुंदरतेने विवेचली आहेत. या काव्यात वारंवार रात्र आणि उषा यांच्या रुपकांचा उल्लेख आढळतो. ही रुपके म्हणजे अनंत गती होत. अनंत गतिमान अशी ही दोन तत्त्वे आहेत या मुळचे उत्क्रांत अवस्थेला पोषक आहेत. रात्र म्हणजे सर्वत्र शांतता, विश्वाची कोणतीही हालचाल नाही. आणि हळूच हालचाल सुरु होते तोच शांतता विरू लागते. या प्रत्येक हालचालीमुळे उत्क्रांत अवस्था जन्म घेत असते. उषा अवतरते म्हणजेच बदल होतो. सावित्रीचा जन्म, सत्यवानाचा मृत्यू या दोन मानवी उत्क्रांतीच्या अवस्था आहेत. अमरत्वासाठी सत्यवानाचा मृत्यू काळ आहे हे समजलेच पाहिजे. उषःकाल होण्यापूर्वीची रात्र ही साविचीच काळोखी रात्र होती. कारण तिचा तो वियोग काळ होता. एक वर्षाचा अवधी संपल्यामुळे सत्यवानापासून तिची फारकत होणार होती. परंतु आत्मदृष्टीने रात्र म्हणजे कल्याणाची पहाटच होय आणि भविष्याच्या उदरात हे कल्याण दडलेले असते. तो दिवस केवळ सत्यवानाच्या मृत्यूनेच भांवणार नव्हता. परंतु मर्त्य मानवाला अमरत्व प्रदान करणारा होता.

## सावित्रीचा स्वभाव

एके ठिकाणी भयंकर अंधार तर दुसऱ्या बाजूने दिवसाला प्रकट करविणारी प्रकाश किरणे, सावित्री या दोहोमध्ये उभी होती. अंधार आणि प्रकाश. ती मानवी व दैवी आविष्कारणामध्ये उभी होती. ती केवळ मानवी नव्हती. तशी असती तर तिने मदतीसाठी कुणाला तरी बोलविले असते. अथवा नुसती रडत बसली असती. ती नुसती दैवी असती तर मर्त्य लोकांची दुःखे तिला कळली नसती. ती दोन्ही असल्याने दोनही अनुभवू शकत होती. तिची मुद्रा शांत होती आणि तिचे हृदय धैर्याने व्यापिले होते. तो एकाकी होती. परंतु तिच्यावर जगाचा भार होता. तिला दैवी बनून पृथ्वीवरील दुःखाकडे पाठ फिरविता आले असते. तिने भौतिकतेचा त्याग केला नाही. अथवा संन्यस्त

वृत्ती पत्करली नाही. तिचे तत्वज्ञान साधे होते भौतिकता व आध्यात्मिकता या मधील शांत व समवृत्ती तिची कधी ढळली नाही. आणि हेच तिचे खरे चित्रण आहे. दैवी वारसा ती विसरू शकत नव्हती. तसेच पृथ्वीवरील दुःखांनाही ती पाठमोरी होऊ शकत नव्हती. दैवी आणि मानवी प्रवृत्तीचा सावित्रीमध्ये संगम झालेला आढळतो.

## सावित्रीच्या पुढे असलेले कार्य

तो दिवस उगवला. सूर्य आकाशात मध्याकडे वळाला. थोड्याच वेळात सावित्रीला मृत्यूशी दोन हात करण्याचा प्रसंग येणार होता. मृत्युदेवांना करुणा नाही हे ती जाणून होती. म्हणूनच व्रताचे आचरण डोळ्यातून एकही अश्रू न टाळता पार पाडले. तिला मृत्युदेवाशी दोन हात करावयाचे होते. ती वेळ आता येत चालली. तिने मनाचा निर्धार केला. ती शांत आणि धैर्याने राहिली, तरच तिला मृत्युशी झुंज देता येणे शक्य होते. एकाकीच तिला मृत्युदेवतेला सामोरे जावयाचे होते. ज्या सुळावरून तो तिला फासावर लटकावणार होता तो सूळ ही तिला स्वतःलाच न्यावा लागत होता.

## नचिकेत आणि सावित्री

हिंदु तत्वज्ञानात अमरतेवर विशेष भर देण्यात आलेला आहे. पण गीता सांगते, जे जन्मले ते मरते, असे जर आहे तर अमरणपण ते काय राहिले ? मृत्यूवर मात केल्या शिवया अमरत्वाची भाषा निरर्थक ठरेल. मृत्यूवर मात करता येईल काय ? नचिकेत यमाला अंतक म्हणून संबोधतो. म्हणजेच सगळ्याचा शेवट करणारा, हेच योग्य नाही का ? अपण सर्वच हाच अनुभव घेत असतो. त्या अंतकाचे रहस्य समजावून घेण्यासाठी नचिकेत जीवंतपणीच यमाकडे स्वतःहून चालत गेला. मात्र सावित्रीबाबत वेगळेच घडले. मृत्यू तिला शोधत आला. सत्यवानाला त्याला नेणे शक्य न झाल्याने मृत्यू आणि सावित्री समोरासमोर आली. तिच्या पुढे प्रश्न मृत्यूला कसे जिंकावे हा होता. रहस्य समजून घेण्याचा नव्हता. त्याच्याच राज्यात त्याला जिंकावयाचे होते. ती त्याच्या पाठोपाठ गेली. परंत पृथ्वीवर आली ती त्याला जिंकूनच, हे फार मोठे श्रेय तिने प्राप्त केले. मृत्यूला जिंकणे ही काही लहान सहान घटना नाही.

## मानुषी आणि दैवी सावित्री

लग्नापूर्वी पासूनच तिला हे माहित होते की सत्यवानाचे प्राण हरण करण्यासाठी यम ठरलेल्या वेळी येणार आहे. एक वर्षभर ती मृत्यूशी दोन हात करण्याची कसून तयारी करत होती. ठराविक दिवशी येत आहे ही गोष्ट जरी निश्चित होती तरी त्या सकाळी तो येणार ही गोष्ट वेगळी होती. या वर्षभरात तिने मृत्यूला कधी विनवणी केली नाही. आपल्या पतीला वाचविणासाठी देवाकडे सुद्धा रदबदली केली नाही. अथवा मृत्यूपासून पळ काढण्याचा प्रयत्न ही केला नाही. त्या भयानक दिवासची ती वाट पाहात होती व त्यासाठी तिने जय्यत तयारी पण केली होती. वर्ष भरकन् निघून गेले. तो भयानक क्षण जवळ येवून ठेपला. लग्न झाल्यापासूनचे दिवस किती झटकन गेले हे तिला आठवले. बारा महिने कसे नाहीसे झाले. आता ते महाभयंकर उभे राहिले आहे. आतून ती विदीर्ण झाली होती. वर्षभरातल्या सुखद स्मृती तिला सतावत होत्या.

मृत्यूच सर्वांचे शेवटचे स्थान ठरवीत असतो. काल प्रवाहात हळूच पावले वाजताच तोच यमराज येवून उभा ठाकतो. प्रत्येकाचे दार तो ठोठावतो. दार उघडून प्रत्येकालाच त्याच्या बरोबर, मुकाट्याने जावे लागते. सावित्रीकडे ती सकाळ सर्व स्मृती घेऊन आली. अगदी बालपणापासूनच तो मृत्यु समोर उभा असल्या पर्यंतची स्मृती जागी झाली. तिच्यातील स्त्री सुलभ भावना व्यवस्थित व्यक्त होताना दिसतात.

### तेजस्वी सावित्री

सुकुमार सावित्री परिस्थिती प्राप्त होताच प्रचंड रुप धारण करते. ही एकाकी सर्व नाशाच्या टोकाला उभी होती. आणि तरी सर्व मानवाच्या अमरतेसाठी वकीली करत होती. त्या यमाशी कोण बरे एकाकी संबंध ठेवणार ? सावित्री त्याच्याशी सामोरी ठाकलेली आहे. तिला हे धैर्य कोठून आले ? तिच्यातील मानवाबद्दलचे प्रेम आकाशाहून व्यापक झाले. तिच्या हृदयात संपूर्ण विश्व सामावले गेले. मृत्यूपासून भीती नष्ट झाली. ती नष्ट होताच मानवाला अमरत्वाचा अनुभव येवू लागतो. त्यासाठी मानवाने प्रत्यक्ष मृत्यूशीच संवाद करावयास हवे. सावित्रीने तेच केले. त्यामुळे इतर मानवांना निश्चित दिलासा मिळाला. अज्ञान व मृत्यू यांच्या बरोबर राहावयाचे की अमरत्वाच्या आणि जाणिवेच्या मार्गाने जावयाचे हा मोठा प्रश्न सावित्री समोर होता. दैवाधीन होणे हे तिला पसंत नव्हते. मृत्यू देवते बरोबरच सोक्षमोक्ष लावण्याचे तिने ठरविले. मानवाला अमरत्वाचा हक्क आहे. त्यांनी तो मृत्यूपासून मिळविलाच पाहिजे. सावित्री मानवाला प्रोत्साहन देण्या करता मनातील अवस्थेतील शस्त्र हातात देत आहे. घाबरलेल्या मानवाला प्रोत्साहन देण्याकरता मनातील अवस्थेतील शस्त्र हातात देत आहे. घाबरेल्या मानवाला आश्वासन देत आहे. जे सावित्रीला शक्य झाले ते इतर मानवांना शक्य झालेच पाहिजे. प्रत्येक मानव मृत्यूला आव्हान देऊ शकेल. सावित्रीने दैव बदलण्याचे ठरविले. सावित्रीने सत्यालाच सामोरे जावयाचे ठरविले. जिवंत समस्यांना सामोरे जाणे म्हणजेच जागरुकतेने आवडनिवड बाजूला ठेवणे होय. सत्यवानाच्या मृत्यूबद्दल तिला आवड निवडीचा अधिकार नव्हता. अमरतेचा अधिकार प्रस्थापित करण्याचा तिने चंग बांधला. या साठी प्रत्यक्ष यमाशी ही संघर्ष करण्याचे तिने ठरविले. हाच सावित्रीचा थोरपणा.

### दुर्दैवी पहाट

काहीतरी भयंकर घटना घडणार आहे असे चुकूनही तिने सासूला भासू दिले नाही. उलट अत्यंत नम्रपणे सासूला एक विनंती केली. ती विनंती करताना देखील त्याचा मागील हेतू अजिबात कळता कामा नये याची सावित्रीने खबरदारी घेतली होती. वर्षभर मी आपणाला कशाबद्दल काही मागितले व सांगितले नाही. आज माझ्या मनात सत्यवान जात असलेल्या ठिकाणी त्याच्याबरोबर जावेसे वाटते. तेथील वनाची शोभा पहावीशी वाटते मला जाऊ द्याल ना ? प्रश्न विचारताना निर्माण झालेली सहजता, मार्दव हे पाहून सासूला गहिवरुन आले. त्यातून तिची ही पहिलीच विनवणी सासूने अत्यंत आनंदाने परवानगी दिली.

परवानगी मिळताच उभयता आनंदाने वनात गेली. तेथील वनश्री पाहण्यात सावित्री दंग झाली. सत्यवानालाही अतिशय आनंद झाला. आज त्याची प्रिया बरोबर होती. त्याने अतिशय प्रेमाने झाडे, पक्षी, फुलांचे ताटवे, वेली विस्तीर्ण हिरवळी, जलाशये इत्यादी दाखविली. तिच्या सहवासात हिंडला, सावित्रीचं मन मात्र उदासीन होते.

तो क्षण जवळ येत चालला. सत्यवान एके ठिकाणी थांबला. त्याला आपले नित्याचे काम उरकायचे होते. काम आटोपून ती उभयता हिंडत राहिली. सावित्री त्याला सर्व अंगानी पहात होती. जितके क्षण त्याला पाहून घेता येईल तेवढी ती पहात होती. सत्यवान अतिशय आनंदात होता कारण सावित्री यावेळी त्याच्या जवळ होती. ती एकटक त्याच्याकडे पहात होती. काही क्षणातच सत्यवान जाईल आणि फक्त त्याची स्मृती राहील. त्याचा प्रत्येक शब्द ती टिपत होती. सोन्याहून तिला त्याचा शब्द मोलाचा होता. तो झाडावर लाकडे तोडण्यासाठी चढला. एकाएकी त्याला अस्वस्थता वाटू लागली. त्याला अशक्तता जाणवू लागली. कुऱ्हाड उचलण्याची ताकद आपल्यात

नाही असे त्याला वाटले. तो खाली उतरला आणि सावित्रीच्या मांडीवर येऊन झोपला. सावित्री शांत होती. तिला नक्की खात्री झाली की तो विनाशाचा क्षण वेगाने येत आहे. ती मृत्यूशी सामना करण्याच्या तयारीत होती. मी यमाशी सामना करणारच असा दृढनिश्चिय तिने केला.

**यमाने सत्यवानाचे प्राण हरण केले.**

सत्यवान मांडीवर झोपला होता. सावित्री एकाकी होती. मृत्यूची जड पावले जवळ वाजू लागली. सत्यवानाचे प्राण वर येऊ लागले. थोड्याच वेळात सावित्रीला जाणवले आपण सत्यवानाबरोबर एकाकी नाही. आपल्या एकांतात तिसरा कोणीतरी डोकावतो आहे त्याच्या उपस्थितीने निसर्ग देखील एकदम भीतीने भिजून गेला. त्याला असे दिसले की एका भयानक राक्षसाने दोन प्रेमिकांचा डाव उधळून टाकला आहे. आता कृष्ण-छाया वाढू लागली. माणुसकीचा गंध नसलेल्या, भावनाशून्य, क्रूर अंतकाची ती पावले होती. आपल्या टाचेखाली या नृशंसाने संपूर्ण विश्वाला यःकश्चित् ठरविले आहे. छाया आणखी दाट होऊ लागली. ती छाया सगळ्या वस्तूला आपल्या छायेखाली गडप करून टाकू लागली. मध्यान्हीच रात्र झाल्या सारखे सावित्रीला वाटले. जो येणार म्हणून भीती दाखवत होता तो आज आलेला आहे याची सावित्रीला जाण आली. सत्यवान, सावित्रीच्या हातून त्या क्रूर मृत्यूच्या आधीन झाला. त्या भयाण अरण्यात सावित्री मृत्यूच्या समोरासमोर एकाकी होती. सत्यवान आता थंड पडला. सावित्री आता आक्रंदन करील काय ? मृत्यूला विनवील काय ? सावित्रीने सत्यवानाचे शरीर आपल्या कवेत घेतले. मग हळूच ते मृत शरीर जमिनीवर ठेवले आणि शांत कोणत्याही प्रकारे न डगमगता झोपेतून उठावे व कामाला लागावे तशी ती उठून उभी राहिली.

**मन:स्थिती**

जीवनातील सत्ये कोण पाहू शकतो ? विचार करणारा आणि मनावरील पगडा जेव्हां नाहीसा होतो तेव्हाच जीवनाचे सम्यक् दर्शन घडते. मनात विचारांची गर्दी होते. त्यावेळी जीवनातील सत्य पाहाता येत नाही. विचार करणारा नेहमीच चित्रणे उभी करतो. सत्यवानाला अशी चित्रणे उपयोगी पडत नाहीत. सावित्री शांत व विचार रहित असल्याने ती मृत्यूला पाहू शकली. असा अनुभव सर्व सज्जनाना नेहमीच येतो. अशा वेळी प्रचंड शक्ती मदतीला येते. ही आध्यात्मिक शक्ती होय. हा चमत्कार नव्हे. अशी प्रचंड शक्ती सावित्रीला प्राप्त झाल्यामुळे यमाशी दोन हात करावयास ती सिद्ध झाली. तिच्यातील दैवी अंश आता कार्य करू लागले. जे काही घडते आहे ते पहात रहा. कर्ता आणि विचार उपस्थित करू नका, जी घटना असते तिला घडू द्या. असे अनुभवणे हीच समर्पणाची भूमिका होय. समर्पणच जीवनातील आध्यात्मिकतेचे खरे रहस्य आहे. सावित्रीने क्षणभर सत्यवानाकडे पाहिले व ताठ मानेने यमाकडे पाहिले, तिला त्याच्यात काय दिसले ?

सगळ्या भूतमात्रांची मर्यादितातच तिने पाहिली. तो खरोखरच, सर्वांचा अंतक आहे पाहून त्याचे यथार्थ वर्णन असूच शकत नाही. शून्यताच तिथे धैमान घालीत होती. यमाकडे पाहावयाचे म्हणजेच एकाकी असलेल्याचे दर्शन घ्यावयाचे. तिथे प्रवेश म्हणजे सर्व प्राण्यांची जिथे इतिश्री होते ते ठिकाण. निर्मनुष्य शांततेचा आश्रय घेण्यासाठी कोणीही मर्त्य आपले डोके उचलून यमाकडे पाहू शकणार नाही. एक स्त्री आपल्या समोर उभी ठाकते व आपल्या अस्मितेला आव्हान देते हे पाहून मृत्यूलाही जरा चमत्कारिक वाटले म्हणून मोठ्या आवाजात कडकपणे यम तिला म्हणाला.

**त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष**

सावित्रीने यमाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. 'सावित्री मागे फिर' हे शब्द आपल्या कानी पडलेच नाहीत असे भासविले. यम सत्यवानाला घेऊन निघाला, सावित्री मागून निघाली. एका भयाण शांततेतून हा प्रवास सुरु

झाला. इथे प्रश्न असा होता की सत्यवानावर अधिकार कुणाचा ? सावित्रीचा की यमाचा ? हा अधिकार प्रस्थापित करण्यासाठीच सावित्री यमाचा पाठलाग करु लागली. आता ते अशा भूभागात आले की मर्त्य लोकांना तेथे प्रवेश नव्हता. सत्यवानाने तिच्याकडे पाहिले. कारण तिला पुढे येता येणार नाही असे त्या पाहण्यातून त्याने भासविले. हे सत्यवानाचे पाहणे यमाच्या लक्षात आले. तो सावित्रीला म्हणाला आता तू मागे फिर, या यमाच्या सांगण्याने सावित्री मागे फिरली का ? का यमाच्या शब्दाला तिने मान दिला ?

यापैकी सावित्रीने काही केले नाही. सावित्रीने तिकडे ढुकूंनही पाहिले नाही. यमाला आश्चर्य वाटले. सावित्री म्हणजे कोण आहे याची कल्पना त्याला आली नाही. आपल्या शब्दाला ती काहीच किंमत देत नाही याचा अर्थ काय ? आता तिने तिने परतावे असे यमाला वाटले. परंतु यमाची पूर्ण निराशा झाली. त्याला आपला अपमान झालासे वाटले. आपल्या राज्यात प्रवेश करणारी ही जिवंत स्त्री कोण लागून गेली आहे. हा सारा प्रदेश निर्मनुष्याचा आहे. अशा भयाण अंधारात सावित्रीने प्रवेश केला. तो प्रदेश इतका अंधारमय होता की दुसरे पाऊल कुठे टाकावे हे देखील कळत नव्हते. त्या अंधारात यम व सत्यवान दिसेनासे झाले. तरी ती निश्चयपूर्वक चालत राहिली.

### यमाने लालूच दाखविली

त्या अंधारात हळूच पावलांचा आवाज ऐकू येऊ लागला आणि अंधुकपणे सत्यवान पण दिसू लागला. तिला हायसे वाटले. इतक्यात यमाने गर्जना केली. ती गप्पच राहिली. आता तिला पुष्कळ बळकटी आली होती. आपले अमर जीवन तिने अनुभविले आपण अव्यक्त आणि अजन्मा आहोत ही जाण येणे याचाच अर्थ व्यक्ततेच्या पलीकडे असलेले अमरत्व अनुभवणे होय. आपण सार्वभौम आहोत अशी मृत्यूला जाण द्यावयाची होती. त्यामुळे मर्त्यांकडे तो तुच्छतेने पाहतो. तो म्हणाला मानव देवादिकाना भजतो, त्यांनी मानवाला कोणती श्रेष्ठ वस्तू बहाल केली ? यावरून सावित्रीला त्याने असे सुचविले की तू आता माघारी जा. पुढील मार्ग निषिद्ध आहे. पण ती बदलली नाही. यमाने दुसरी युक्ती योजिली. काही वर देऊन तिला खूष करण्याचे त्यांनी ठरविले. केवळ धाक-दपटशाने ती बधत नाही तिला वर देऊन शांत केले पाहिजे त्यानी तिला विनविले सावित्री हा प्रयास व्यर्थ आहे तू आता माघारी फिर मी तुला वर देतो.

### यमाशी संवाद

सावित्रीने एकदाचे मौन सोडले. ती यमाला म्हणाली, ''अशा वराने मी संतुष्ट होऊन माघारी जाणारी स्त्री नाही. यमा हे तू लक्षात ठेव.'' आपल्याला वरचढ होईल अशी एक स्त्री तुझ्या समोर उभी ठाकली आहे. आणि धैर्याचा कोट तिने आपल्या भोवती उभा केला आहे आता तुला वर द्यावयाचाच असेल तर सत्यवानाला जन्मभर जे अपेक्षित होते पण प्राप्त झाले नाही ते सारे प्राप्त होवो. त्याला असे वाटत होते की, वडिलाना दृष्टी मिळावी, त्यांचे राज्य त्यांना परत मिळावे व ते सुखाने राहावेत हे त्यांना सारे प्राप्त होवो. हे जमत असल्यास दे अन्यथा ही तुझी केवळ बडबड ठरेल. ही माझी काही मागणी नाही. तू द्यावयाचे ठरविले आहेस. तुझे तू ठरव.'' यम या भाषणाने क्षणभर चमकला. त्याने सावित्रीची तारीफ केली आणि हे सर्व काही मिळेल असे यमाने तिला सांगितले.

आता माघारी फिरविण्याचा मला अधिकार आहे असे यमाला वाटले. तो तिला म्हणाला, 'सावित्री मागे फिर अन्यथा आज्ञाभंग केल्याचे दारूण परिणाम भोगावे लागतील.' कारण येथील नियम भयानक आहेत. तिला घाबरून हाकलण्यासाठी यम असे बोलला. सावित्रीने त्याची पुन्हा निराशा केली. आपल्या अधिकारालाच आव्हान देईल असा कोणी मर्त्य आजवर आपल्याला भेटला नव्हता म्हणून त्याने धमकी दिली. सावित्री म्हणाली, 'तुझे

राज्य दोषपूर्ण आहे आणि त्याची सुधारणा होणे आवश्यक आहे. प्रेमाने तुझ्या राज्याची पुनर्रचना करणे आवश्यक आहे.' हे शब्द यमाला झोंबले.

माझ्या दमदाटीचा उपयोग झाला नाही. मग आता बुद्धीचा उपयोग करून पहावे आहे असे यमाला वाटले. कदाचित सावित्रीचे समाधान होईल व ती माघारी फिरेल तो म्हणाला, 'सावित्री मी अरूप आहे परंतु तुझा हट्ट आहे म्हणून मी रुप धारण केले. सावित्री तू जर अमर आहेस तर तुला दुसऱ्याची आवश्यकता कुठे उरली.? अमरतत्व स्वत:पुरते पुरेसे आहे.' सावित्री म्हणते, 'यमराज - बुद्धिभेद कसा करावा हे तुमच्याकडून शिकावे. बुद्धी कुणाशी जुळवून घेऊ शकत नाही. कारण बुद्धीला कोणावरही श्रद्धा वा विश्वास ठेवता येत नाही. ती पुढे म्हणाली मी प्रेम करते एवढेच पुरेसे आहे. प्रेम हे बुद्धीला अगम्य आहे. म्हणून तुझा तर्क येथे व्यर्थ आहे. तू अनेक तर्क करू शकशील परंतु यमा तुला प्रेम काय आहे हे कदापि कळणार नाही.' सावित्रीचे बोलणे यमाला वरचढ वाटले ती त्याला म्हणाली, 'मी प्रेम करते म्हणून मला त्याचे ज्ञान आहे.' म्हणून यमाला तिने सुचविले की, शुष्क ज्ञान प्रेमाशिवाय व्यर्थ आहे. फक्त प्रेमच, सत्याचे आविष्करण करू शकते. प्रेम यमाचा बुरखा फाडून टाकणारे ठरेल. यमाला काही बोलता येईना तो स्तब्ध झाला, प्रेम सर्वांनाच जिंकते. श्री. अरविंदानी या काव्यात प्रेमच अजिंक्य ठरले असे दाखविले आहे. प्रेम हेच अस्त्र प्रभावी ठरले या अस्त्रानेच यमाचे शस्त्र बोथट झाले. सावित्रीच्या हातात हे प्रभावी अस्त्र होते.

### मृत्यु आणि प्रेम

शाश्वत व दीर्घकाळ टिकणे ही दोन्ही एक नव्हत. शाश्वत म्हणजे कालातीत आणि दीर्घकाळ म्हणजे खूप कालावधीपर्यंत राहणारे. मन हे काळाने बद्ध तर मृत्यू काळातीत. म्हणून यम काय आहे याची कल्पना होणे अत्यंत कठीण. मात्र मनाला कालातीत अवस्थेतील प्रेमाचा अनुभव येवू शकेल. मृत्यू आणि प्रेम यांचे सख्य आहे. प्रेमामुळे मृत्यूचा कायापालट होतो अशा स्थितीत जन्म आणि मृत्यू अविभाज्य होतात. त्यांच्या सहजीवनात एकमेकांना ओळखता येते. सावित्रीचा हा अंधारातील प्रवास यमाचा कायापालट करण्यासाठीच होता. असे झाले तर मानवाला मृत्यू हा भयंकर आहे असे वाटणार नाही. तो मानवाचा मित्र होईल. आणि तोच संपूर्ण जीवनदर्शन घडवील. त्याला मित्र करून घेण्यासाठी मानवाला भयाण अंधारातून प्रवास करावा लागतो आणि ते सुद्धा मृत्यू बरोबर.

यम म्हणतो, ''सावित्री भव्य आदर्शांना इतके महत्व देऊ नकोस. आदर्श ही मानवी मननिर्मित कल्पना आहे. तुझ्या ठिकाणच्या प्रेमाचा एवढाच अर्थ आहे.'' मृत्यू तिच्या प्रेमाची टर उडवत आहे, हा आदर्शांचा बुडबुडा एकदाचा फुटतो व प्रेम हे शांत होते. असे आदर्श अल्पजीवी असतात. सत्यवानावरील मोह म्हणजे तुझे प्रेम होय. हे तुझे प्रेम वैयक्तिक स्वरुपाचे आहे. तुझ्या शरीराची व मनाची भूक भागविण्यासाठी हा प्रेमाचा बुरखा तू घेतलेला आहेस. सावित्री हे वैयक्तिक प्रेम हळूहळू शांत होणारे आहे. बरे झाले मी सत्यवानाला नेत आहे. अन्यथा तुझा थंडपणा त्याला जाणवला असता.''

यमाचे हे बोलणे काही औरच आहे हे सावित्रीच्या ध्यानात आले. आता बोलण्यात धमकी नव्हती, निष्ठुरता नव्हती अत्यंत समजुतीचे त्याचे बोलणे होते. हे ओळखून ती यमाला म्हणाली यमराज प्रेम शारीरिक जरी असले तरी त्या प्रेमात दैवी शक्तीच असते आणि तेही शाश्वतच असते. प्रेम म्हणजे उडाणटप्पूपणा नव्हे आणि माझं प्रेम हे शरीर सुखासाठी मुळीच नाही. यमराज ऐक - आम्ही उभयता एकदाही एकांतवास केला नाही. तरी देखील आम्ही उभयता अनादी काळापासून एकत्र बांधले गेलो आहोत. यमराज प्रेमाची भाषा तुला कळत नाही या बाबत तू न बोललास तर बरं होईल. अरे, प्रेम कशाशी खातात याची तुला कल्पना तरी आहे काय? अरे तू नित्य

अंधारात राहणारा, प्रकाशाची पहाट काय असते हे तुला कसे कळणार ? प्रेमाबद्दल तू न बोललेले बरे. माझ्या हृदयात एकच देव आहे तो म्हणजे सत्यवान.

पुन: यम म्हणाला, ''आदर्श फसवी असतात. आदर्श ही एक मनाची भव्यता आहे त्याला काही अर्थ नाही. मन एकत्र अजस्त्र यंत्र आहे. देवाचा विचार आला लगेच मनाच्या यंत्रात देव तयार झाला. मनाचे विश्व अतिशय फसवे आहे. आणि ही सारी आदर्शे मनाशी निगडीत आहेत. त्याची निर्मिती विचारातून झाल्यामुळे अविश्वसनीय आहेत. मन आदर्श निर्माण करते त्याला साज शृंगार चढविते आणि मग ही आदर्शे दैनंदिन जीवनात आचरणासाठी झगडा सुरु करते. जीवानाच्या धकाधकीतून पळ काढण्यासाठी मन आदर्शे निर्माण करते म्हणून सावित्री या मनाच्या वेवनाबाला तू बळी पडू नकोस.''

सावित्रीने सत्यवान हा यमाचा का तिचा हाच प्रश्न धसास लावला आहे. यम जिंकणार का सावित्रीचे प्रेम अजिंक्य ठरणार याचा निर्णय अद्याप लागावयाचा आहे.

**कर्म आणि प्रतिक्रिया**

इथे प्रश्न असा उपस्थित होतो की आपण करतो ते खरे कर्म असते का ती एक प्रतिक्रिया असते. आपले कर्म म्हणजे प्रतिक्रियाच असते कारण जाणीव हे कर्माचे केंद्रस्थान आहे. ते कर्म होऊ शकत नाही. कर्माला कोणतेही केंद्र नसते ते आपोआप घडते विचारापूर्वी कर्म घडून जाते म्हणजे ते कर्म अविचारी असते असे नसून विचारापासून ते अलिप्त असते. विचार मागाहून येतो. त्या विचाराची प्रवृत्ती कर्माच्या वर्णनासाठी असते. विचारापूर्वी घडणारे कर्मच खरे कर्म या संज्ञेला पात्र होते. सावित्रीत एकदम बदल घडला आता विचार करण्याचा लोप झाला. म्हणूनच यमाशी तिला दोन हात करता आले. कर्म म्हणजेच प्रतिक्रिया. यामुळे मानसिक तणाव, निराशा, हुरहुर आदी निर्माण होतात. प्रेम हेच पूर्ण कर्म आहे. हे ध्यानात घेतले पाहिजे. प्रेम साऱ्या प्रतिक्रियेपासून आलिप्त असते. बाह्य गोष्टींच्या आव्हानामुळे प्रतिक्रिया घडते. प्रेमाला आव्हानाची जरुरी भासत नाही. सगळ्या आव्हानापासून ते मुक्त आहे. आदर्श प्रतिक्रियात्मक शृंखला तयार करताना व त्या बद्ध करतात यमाने असा युक्तिवाद केला खरा, पण सावित्री खमकी होती. ती या बौद्धिक कसरतीला बधली नाही. यम सत्य दडवू पाहतो.

ती म्हणते,'' यमराज तू एक थोर तत्ववेत्ता म्हणून शोभून दिसतोस. तू फक्त शब्दजाळ पसरविणारा जादुगार आहेस आणि जाळ्यात सत्य दडवून ठेवू पहात आहेस. बुद्धिभेद करण्यात तू पटाईत आहेस. तू सत्याचा खून पाडणारा आहेस. मी सत्य रक्षणासाठी उभी आहे. तू मात्र भलतीच विधाने करून सत्य उधळून लावण्याच्या प्रयत्नात आहेस. यमा सृष्टी निर्माण झाली उत्क्रांत होण्यासाठी. तिचा प्रवाह चालू आहे. आवश्यकतेला शरण जाण्यासाठी काही आत्म्याने जीव धारण केलेले नाही. आणि या गरजेची मोठी निशाणी म्हणजे मृत्यू होय. आतमा मृत्यूच्या मुखात पडण्यासाठी जन्मला नाही. मृत्यू अपूर्ण जगताकडे पाहतो आहे. अव्यक्ततेतून व्यक्ततेकडे ही उत्क्रांत अवस्था आहे. अव्यक्त नेहमीच व्यक्ततेशी नाते ठेवून असते. आणि अव्यक्ताचे हे कार्य कधीच संपणारे नाही. हा खेळ नित्य चालणारा आहे. तू या समग्र खेळाकडे पाहात नाहीस म्हणून तुला तसे वाटते. मानव नेहमीच तुझ्या हातातले खेळणे राहील असे कशावरून ? उद्याच्या मानवाची काय अवस्था राहिल हे माझ्यावरूनच ओळख. हा सृष्टी उत्क्रांतीचा खेळ चालू आहे. यमाचा अधिकार अज्ञान असे पर्यंत.''

सावित्री यमाला म्हणते,'' यमदेवा तुझा अंमल मानवाच्या अज्ञानावस्थे पर्यंतच. याच अवस्थेत तू मानवाची त्रेधा उडवतोस. या सृष्टीच्या मुळाशी कल्याण व आनंदच आहे परंतु बुद्धी आणि जाण यांच्या मधल्या अवस्थेत मृत्यू थैमान घालतो. त्यामुळे कल्याणाला गाढ निद्रा लागते. कल्याण जागृत ठेवण्यासाठीच मृत्यूची

मिरासदारी संपुष्टात आणली पाहिजे." आता सावित्री सांगते, - यमराज तू मर्त्यात धुमाकूळ घालून माजला असशील पण लक्षात ठेव त्या मार्गातही माझ्या सारखी काही खमंग मंडळी तुला भेटतील. ते कदापि विसरु नकोस. आणि मर्त्यात ही जाण निर्माण झाली तर मृत्यू अथवा अज्ञान त्यांना काहीच करू शकणार नाही. मानवी मन मृत्यूच्या छायेखाली झाकोळून जाते. ती खोटेपणाची छाया आहे. एकदा का ही छाया हटवली गेली, तर मृत्युची मातब्बरी चालणार नाही."

### प्रेमच जीवनाचे मूळ

आनंदच सर्वांचा आधार आहे अगदी विनाशाच्या वेळी सुद्धा आपले डोके आनंदामुळे शाबूत राहते. या आनंदामुळेच जगण्याची इच्छा होते आणि ही इच्छा कोणीही दवबू शकत नाही. प्रेमामुळे मानवाला हे सामर्थ्य येते. ज्याने मानवतेवर प्रेम केले आहे त्यालाच देवावर प्रेम करता येईल. यमा, केवळ माझ्या शरीर सौख्यासाठी सत्यवान रहावा असे मी म्हणत नसून अखिल मानवतेसाठी ते होणे आवश्यक आहे. मानवतेचे रक्षण आम्हा उभयताकडून होण्यासारखे आहे. कारण इथे स्त्री आणि पुरुष या उभयतेमुळे पूर्ण मानव्यता निर्माण करावयाची आहे. आमच्या प्रेमावर विधात्याने केव्हाच शिक्कामोर्तब केलेले आहे. त्याचे रक्षण आम्हाला करावयाचे आहे. माझे महत्वाचे कार्य म्हणजे अमर प्रेम आणि हे प्रेम पृथ्वीवरून आटून जाणार नाही हे पाहावयाचे आहे. अंतिम सत्यावर प्रेमाचाच हक्क पोहोचतो आणि प्रेमच मानव व देव यांच्यातील महत्वाचा दुवा आहे. मृत्यो, तू मात्र आडमुठा भेटलास.

### शाश्वतता

सावित्री म्हणते, पृथ्वीवरील जीवन अल्पकाळ टिकणारे आहे. याची मला पूर्ण कल्पना आहे. या बदलत्या गोष्टी मागील शाश्वत गोष्टही मी पाहू शकते. या सगळ्या बदलत्या गोष्टातील शाश्वत मिरवणूक काढीन. सत्यवानावरील प्रेम हे शाश्वत असून ते बदलत्या जगात दडलेले आहे. आणि सत्यवानाशिवाय या गोष्टी कशा पूर्ण होतील. सत्यवानाशिवाय पृथ्वीवर जाऊनही पृथ्वी फुलणार नाही. इथे यमाला सावित्रीचा अर्थ उमजला. पण स्वतःचे बोलणे मोडावेसे वाटेना. पुन्हा शांतपणे प्रवास सुरु झाला. यम म्हणाला सावित्री शाश्वत गोष्ट अशी अशाश्वत जगात कशी राहू शकेल ? तू मनाच्या भ्रमात सापडली आहेस.

### विश्व आणि विश्वात्मा एकच

सावित्री म्हणाली पृथ्वी कधीच आत्म्यासंबंधी बोलत नाही. तो कदाचित आत्म्याचे प्रतीक असू शकेल. परंतु आत्मा त्या प्रतीकात असू शकत नाही. पृथ्वीचा सत्याशी वा ईश्वराशी संबंध तुटलेला नाही. रात्र अज्ञान अंधकाराची असली तरी प्रकाशाचा किरण कुठेतरी दिसतोच. त्याच्या कृतीतच परमात्याला पाहिले पाहिजे. पृथ्वीपासून परमात्मा वेगळा नाही. माझा शोध हाच आहे. विश्वच विश्वात्मा आहे. म्हणून मी देवाच्या देहपणावर पण प्रेम करते. आता सर्वच बोलणे खुंटावयास लागले. म्हणून मृत्यू सावित्रीची स्तुती करू लागला." सावित्री तू ज्ञानी आहेस, सामर्थ्यवान आहेस असे असताना भौतिक गोष्टीत स्वतःची शक्ती व्यर्थ वाया का घालवतेस ? स्वतःला उगाच का कष्टवतेस ? तुला इतके ज्ञान आहे की या रुपामागील आवरण व रुप या दोन्ही गोष्टी तू जाणू शकतेस. रुपामुळे तू मोहून जाणार नाहीस वा ते निंद्य आहे असेही म्हणणार नाहीस. समबुद्धी ही मनुष्यातील श्रेष्ठ गोष्ट आहे. म्हणून यःकश्चित रुपा बद्दलचा तुझा आग्रह इतका योग्य वाटत नाही."

सावित्री म्हणाली," यमराज तू ज्या सम व शांत अवस्थेबद्दल बोललास ती अवस्था नेमकी काय आहे ? ती जर प्रस्थापित नियम बद्ध शांतता असेल तर ती अनात्मच म्हणावी लागेल. नियम अटळ असतील तर मानवाला उत्क्रांत होता येणार नाही. म्हणून शारीरिक व मानसिक उन्नयनासाठी या नियमाचे मानवाला उल्लंघन करावेच

लागेल. मला अध्यात्मिक उत्क्रांती अभिप्रेत आहे. यमराज माझी तू इतकी स्तुती करतोस म्हणूनच माझे खरे स्वरुप मी आता अनावृत करते. म्हणजे काळातीत असलेला सामर्थ्याची तुला कल्पना येईल. ही शक्ती तुझ्या ठिकाणीच आहे. मानव स्वतंत्र आहे.''

यमाने आपली भाषा बदलली. तो म्हणाला, सावित्री सत्यवानाला स्वर्गीय सुखापासून का वंचित करतेस? तुझ्या मिठीत स्वर्गाहून त्याला आनंद होईल ? म्हणजे तू देवाहून श्रेष्ठ आहेस असेच म्हणावे लागेल.

सावित्री म्हणाली, ''मी दैवी मार्गाचा अवलंब करीत आहे आणि हा मार्ग देवानीच तयार केलेला आहे. आपल्या हातातील बाहुले बनावे या इच्छेने देवाने मानवाला निर्माण केलेले नाही. मानवाने आपल्याशी बरोबरी करावी या साठीच देवाने मानव जन्माला घातला. म्हणूनच त्याने मानवाला पूर्ण स्वातंत्र्य दिलेले आहे. मानव स्वतंत्र असेल तरच त्याला मृत्यूपासून भय राहणार नाही. हा भाव जिथे आढळत नाही तिथेच मृत्यू धाव घालतो. त्याला दैवाधीन करतो. स्वतंत्र मानवच देवाला त्याच्या कार्यात मदत करू शकेल. हा स्वतंत्र राहण्याचा मूलभूत हक्क टिकवण्यासाठीच मी प्रयत्नशील आहे. तुझ्या मगर मिठीतून सुटल्या खेरीज मानवाला खरे स्वातंत्र्य अनुभवता येणार नाही. तू मानवाचे स्वातंत्र्य हरण करणार आहेस.''

यम म्हणाला, ''मी मानवाला समुद्रातला बुडबुडा या पलिकडे काही समजत नाही. तू त्याला ईश्वर प्रतिष्ठित म्हणून तो चिरंतन आहे असे मानतेस. म्हणजे कालातीत असूनही काळात चालणारा एक प्रवासी असे म्हणतेस. सावित्री जर तुला सत्य कळले आहे तर सत्याचे दर्शन मला घडविशील ? त्याचे रुप कसे आहे मला दाखव. मी पण त्या सत्याच्या पाठोपाठ जाईन व सत्यवानाला मुक्त करीन.'' ऐवढे बोलून सावित्रीने काही उत्तर देण्यापूर्वीच तो गुप्त झाला. त्या यमाच्या निराकार रुपाला उद्देशून ती म्हणते, यमराज सत्य जाणावयाचे झाल्यास सगळे तर्क गळून पडले पाहिजेत. सत्य आणि ईश्वर ही दोन नव्हेत. यमा तुला सत्य पाहावयाचे आहे पण तर्क बुद्धी टाकत नाहीस. एक आणि अनेक ही परस्पर विरोधी नाहीत. कारण अनेकच एक आहे. यमा तुला अंतिम सत्य पाहावयाचे असेल तर तुला तुझे वेगळे अस्तित्व संपवावे लागेल. सत्य शब्दातीत आहे. सत्य प्रत्यक्ष पाहावयाचे असते आणि हे पाहताच यमा असल्या जागी तु नाहीसा होशील.

### सावित्रीचे तेजस्वी रुप

यम म्हणतो सावित्री तुझ्याकडे ज्ञान आहे आणि प्रकाश आहे. माझ्याशी संघर्ष करण्यासाठी सामर्थ्य तुला कुठून प्राप्त झाले ?

सावित्रीने यमाकडे पाहिले आणि तिच्यात तत्काळ दैवी रुपांतर झाले. ती एक दैदिप्यमान ज्योत म्हणून उभी ठाकली. तो विलक्षण असा क्षण होता. तिचे शाश्वत रुप आता यमाकडे पाहू लागले. आता तिथे सन्नाटा पसरला. यम पण हे रुप पाहून चमकला. त्याला सत्य जाणून घ्यावयाचे नव्हते तो त्याचा खोटा खोटा प्रतिकार होता. यमाचे साथीदार त्याला सोडून गेले. यमाने हळूच पळ काढला व रात्रीच्या आश्रयाला गेला. सावित्रीचे ते तेजस्वी रुप त्याला पहाणे शक्य झाले नाही. म्हणूनच तेथून तो पळाला. आता सावित्री व सत्यवान दोघेच तिथे राहिली. तरी ती उभयता एकत्र येऊ शकली नाहीत त्यांच्यात एक अनाकलनीय पडदा होता. मृत्यू गेला होता पण त्याचे अस्तित्व अद्याप होते.

### मृत्यूला मित्र करावे लागेल

केवळ मृत्यूला जिंकून चालत नाही. त्याचे अस्तित्वही निपटून टाकले पाहिजे म्हणजेच मृत्यूची भिती पूर्णतया नाहीशी होते. आपली आंतरिक शक्ती उभी करून माणूस मृत्युला जिंकील परंतु तो पूर्णतया मृत्युच्या

भीतीपासून स्वतःची सुटका करून घेऊ शकत नाही. त्यासाठी मृत्युचे रुपच पालटले पाहिजे. म्हणजे जन्म अणि मृत्यु यांचा एकत्र सहवास घडून शकेल. सावित्रीने मृत्युचा पराभव कोल परंतु मृत्युचे रुप पालट करण्यासाठी तिला प्रेमाचा उपयोग करावा लागेल तरच तिला सत्यवान परत मिळेल व ती पृथ्वीवर आनंदाने परतेल.

## दैवाधीनता व सुटका

माणूस दैवाधीन आहे. मानवाने निराश न होता मार्ग काढण्याच्या प्रयत्नात लागावे. व दैवाच्या कचाट्यातून मुक्त व्हावे. दैव काळाधीन, काळाचा स्वामी मृत्यू म्हणजे काळ, मृत्यु आणि दैव यांचा असा परस्पर संबंध आहे. एकाला हाता वेगळे केल्यास दुसरी दोन आपोआप नाहीशी होतात. या तीनही गोष्टी कर्मावर अवलंबून काल कर्मावर कर्म दैवावर. मनुष्य या दैवालाच घाबरतो. तो अगतिक होता. मृत्यु खेरीज अटल अशी गोष्ट या जगात दुसरी कोणतीच नाही. दैवाने तो अगतिक होतो. मृत्यू खेरीज अटळ अशी गोष्ट या जगात दुसरी कोणतीच नाही. दैवाचे भयानक स्वरुप म्हणजे मृत्यू. मृत्यूला जिंकल्यास दैवाचा प्रश्न आपोआप बारगळतो. व तो पूर्णपणे कर्मरहित होतो. कर्म केवळ घटना राहतील, मानसिक बंधन तेथे नसेल. हा मानवी जीवनातील अत्यंत जटिल प्रश्न अरविंदानी इथे उपस्थित केला आहे. ते म्हणतात विज्ञानबुद्धीलाही कर्म आणि दैव या पासून सुटका करून घेता आलेली नाही. काळ आणि काळपुरुष ही जीवनाची दोन टोके. काळाच्या जाणिवेने जीवनाची सुरुवात आणि शेवट कालाधीनतेने. या दोन टोकात दैव आणि कर्म संभवतात. काळावर मात करण्याने मृत्युचे भय राहत नाही. दैव व कर्म यांचे अस्तित्व आपोआप नाहीसे होते. काळातीत होणे हेच महत्त्वाचे, तरच मानव शोक व मोह तरुन जातो.

काळावर मात केल्यामुळेच. सावित्रीला यमाशी संवाद करणे शक्य झाले. तिने मृत्यूवर जय मिळविला. मृत्यू आता सज्जन झालेला होता. यमाचे भयानक रुप नष्ट झाले. तिने चर्तुविध रुप पाहिले. प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व शेवटी आनंदमय कोषातून ती त्याला पाहू लागली. मृत्यू आकाराचा नाश करतो. शरीर हे माणसाचे वरचे कवच- त्यातून आनंदोद्गार तिने ऐकिला तो ध्वनी हृदयाकाशातून येत होता. यमा आम्हा उभयतामुळे पृथ्वी व स्वर्ग यांचे नाते जुळेल. स्वर्गातून अवतरण, पृथ्वीवरुन उन्नयन याचे मिलन होईल. या कामी आम्ही उभयता तुला मदत करू.

सावित्री म्हणते दैवी शक्तीचे अवतरण आणि मानवाचे उन्नयन हे कार्य माझ्या समोर आहे हे सोडणे मला शक्य नाही. मानवातील महामानव जागा झालाच पाहिजे. हाच तो उषःकाल. कालातीत ही अनुभवाची गोष्ट. सावित्री काळातीत झाली त्यावेळी मृत्युचाही अंत झाला. मृत्यु कालमर्यादित आहे. प्रेमात अहं राहत नाही तिथे फक्त परस्परता नांदते हेच सायुज्याचे रहस्य.

मन मर्यादित. या मर्यादेपासून मुक्त करून त्याला महामना करणे हे सावित्रीचे खरे कार्य. हे कार्य सत्यवानासह पृथ्वीवर प्रस्थापित करण्याचे तिने ठरविले. मानव्यातून महामानवापर्यंत मनावाची मजल पोहचली पाहिजे. तरच मानव मृत्यू आणि अतिदुःख यापासून स्वतःची सुटका करून घेऊ शकेल.

## विजयी होऊन परतली

तिचा संघर्ष केवळ सत्यवानाला पृथ्वीवर आणण्यासाठी नव्हता. तो अखिल मानवाला अमरतेची कल्पना यावी यासाठी होता. एवढ्याचसाठी सत्यवानाचे प्राण तिला हवे होते. मानवाला शरीर आणि मन याची जरुरी आहे. त्यांचा उपयोग मानवाने महामानव होण्यासाठी केला पाहिजे. एखादे अवकाशयान अंतराळात मुक्त संचार करून अलगद पृथ्वीवर परतावे. इतक्या सहजपणे सावित्रीने सत्यवानाचा आत्मा परत आणला. पृथ्वी मातेने तिचे

स्वागत केले. हा क्षण मानवाला अतीव भाग्याचा ठरला.

### सावित्री कथा - अमर प्रेमाचे प्रतीक

सावित्री भानावर आली सत्यवानाला गाढ निद्रा लागलेली होती. तिने त्याला जागे केले. तो इकडे तिकडे पाहू लागला काय घडले हे त्याला समजेना, तो मृत्यू कुठे आहे ? का केवळ ते स्वप्न होते ? सावित्री म्हणाली जे घडले ते सारे खरे होते. सगळा बदल कसा घडला तिने त्याला सांगितले आता आपली सुटका झाली हे ऐकून सत्यवानाला खूप बरे वाटले. आता रात्र पडत चालली म्हणून ती दोघेही घराकडे परत चालली. विजयी वीरांगनेचे स्वागत करण्यासाठी द्युमत्सेन व राणी वाटच पाहात होती. किती काळ तिष्ठावे लागले इतकेच द्युमत्सेन म्हणाला सावित्रीने घडलेली सारी हकीकत सांगितली ऋषीलोकही ती गोष्ट उत्सुकतेने ऐकत होती. सावित्री त्यांना म्हणाली सर्वत्र प्रेमाचे साम्राज्य निर्माण व्हावे हेच माझे कार्य आहे. आम्ही उभयता हे कार्य करावे असा ईश्वरी संकेत आहे. सत्यवानाचे नव्याने अवतरण झाले हेच ते अमर प्रेमाचे प्रतीक.

**श्री. शं. बा. मठ**
६ कुमार, आशिष, मारुति रोड
ठाणे ४०० ६०२.

❑❑❑

॥ श्री ॥

मा. प्रा. मोहन पाठक,
कार्यकारी संपादक
'दिशा'

यांस स. न.

आपण आवर्जून पाठविलेला जून २००२ 'दिशा' अंक मिळाला. आभारी आहे.

'दिशा' मासिकाचे अंक माझ्या वाचनात आलेले आहेत. त्यामधील स्फुट विचार, मुलाखती, विद्यार्थ्यांशी संलग्न असलेले विचार तसेच पर्यावरण आणि परिसर वार्ता सारखे माहितीपूर्ण लेख आवडले. खास करून 'एक होता कार्व्हर' या पुस्तकाच्या लेखिका श्रीमती वीणा गवाणकर यांचेशी झालेली बातचीत, ते पुस्तक वाचलेले असल्यामुळे मला अधिक आवडली.

नावाप्रमाणेच हे मासिक विचारांची 'दिशा' वाचकाला दाखवीत असते. एक उपयुक्त प्रकाशन आपण प्रसिद्ध करीत असता त्यावद्दल अभिनंदन.

आपला,
**श्री. अविनाश कार्डे**
शास्ता, समर्थ सेवक मंडळ,
ठाणे - ४०० ६०१.

# साहित्य-जगत

निष्ठेने ग्रंथ प्रसाराचे कार्य गेली अनेक वर्षे स्वत:चे पैसे खर्च करून करणारे ज्येष्ठ ग्रंथप्रेमी श्री. शरद जोशी. शरद जोशींनी निःस्पृहपणे हे कार्य चालू ठेवले आहे. त्यांनी पाठवलेल्या या ग्रंथ वार्ता. - संपादक

## भाषा आणि जीवन - एक संग्राह्य त्रैमासिक

१९८२ साली सुप्रसिद्ध भाषा वैज्ञानिक पद्यश्री डॉ. अशोक केळकर (७, धनंजय, ७५९/८३ भांडारकर रस्ता, गल्ली क्र. ६ मार्गे, पुणे - ४११ ००४. दूरध्वनी (०२० - ५६५४९०१) यांनी **मराठी अभ्यास परिषद** (अ, अन्नपूर्णा, १२५९, शुक्रवार पेठ, सुभाषनगर गल्ली क्र. ५, वाडिया हॉस्पिटलासमोर, पुणे - ४११ ००२. दूरध्वनी क्र. ९५२० - ४४८६०१५) या संस्थेची स्थापना केली. संस्थेतर्फे 'भाषा आणि विज्ञान' हे त्रैमासिक प्रसिद्ध केले जाते. संपादक (मृणालिनी शहा, १, शीतल अपार्टमेंट, ४६/४, एरंडवणे, पुणे - ४११ ००४. दूरध्वनी - ९५२०-५४३३८६९.) संपादकीय संपर्क व परीक्षणार्थ पुस्तके याच पत्त्यावर पाठवावी. व्यवस्थापकीय संपर्क व पैशाचा भरणा करण्यासाठीचा पत्ता असा : नीलिमा गुंडी, ३, अन्नपूर्णा, १२५९, शुक्रवार पेठ, सुभाषनगर गल्ली क्र. ५, वाडिया हॉस्पिटल समोर, पुणे - ४११ ००२.

## संपादन समिती

मृणालिनी शहा (प्रमुख), अशोक रा. केळकर, गं. ना. जोगळेकर, मॅक्सीन बर्निसन, प्र. ना. परांजपे, डॉ. द. दि. पुंडे, आशा मुंडले, अंजली सोमण, विजया देव, नीलिमा गुंडी. प्रकाशनाची कालनियता-त्रैमासिक-जाने, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर, वर्गणी भरण्यासाठी पत्रिकेचे वर्ष जाने ते डिसेंबर असे आहे. या त्रैमासिकाचे वर्षात चार अंक निघतात. १ जाने. २००२ पासून वर्गणीचे दर पुढीलप्रमाणे आहेत. वा.व. संस्थेला रु.१२५/- पंचवार्षिक रु. ५५०/ व्यक्तीला रु. १००/- पंचवार्षिक रु. ४५०/- आजीव वर्गणी मराठी अभ्यास परिषदेची आजीव सदस्यत्व वर्गणी रु. एक हजार. पूर्वीच्या आजीव सदस्यांनी वर्गणीतील वाढीव रक्कम रु. ४४०/- भरावी असे परिषदेचे आवाहन आहे.

## पैसे भरण्याबद्दल सूचना

वर्गणी प्रत्यक्ष रोखीने किंवा धनादेशाने देता येईल. कृपया मनिऑर्डर पाठवू नये. धनादेश 'मराठी अभ्यास परिषद' या नावाने काढावा धनादेश पुण्याबाहेरच्या शाखेचा असल्यास रकमेत ५/- वटणावळ अधिक घालावी. धनादेशासोबत आपले नाव, पत्ता, रक्कम, कोणत्या वर्षासाठी वर्गणी ते अवश्य लिहावे. पावती दिली जाईल नमुना अंक मिळाला असल्यास कोणता याचा उल्लेख करावा.

## मागील अंक व संस्थेची प्रकाशने

'भाषा आणि जीवन' हे त्रैमासिक **१९८३** पासून सुरु झाले आहे. (१९८३) साली मात्र दोनच अंक निघाले होते). एखाद दुसऱ्या अंकाचा अपवाद वगळता सर्व वर्षांचे अंक उपलब्ध आहेत. १९८३ ते ९० पर्यंतच्या प्रत्येक अंकाची किंमत रु. १०/- व १९९१ पासून पुढील वर्षांतील प्रत्येक सुट्या अंकाची किंमत रु. २५/- आहे. या त्रैमासिकातील निवडक लेखांचे संपादित पुस्तक निवडक भाषा आणि जीवन (किंमत रु. २००/-) परिषदेच्या कार्यवाहका कडे अथवा मेहता पब्लिशिंग हाऊस (१२१६, सदाशिव पेठ, धनश्री अपार्टमेंटस् पुणे - ४११०३०) यांच्याकडे मिळू शकेल. तसेच 'भाषांतर मीमांसा' हे

पुस्तकही कार्यवाहकाकडे अथवा प्रतिमा प्रकाशनाकडे (१३६२ सदाशिव, औदुंबर अपार्टमेंटस्, नवा विष्णू मंदिर चौकाजवळ, ऑफ बाजीराव रोड, पुणे ४११०३०) उपलब्ध आहे.

मराठी भाषेच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या मराठी अभ्यास परिषद व संस्थेचे नियतकालिक भाषा आणि जीवन (त्रै) यास जिज्ञासू वाचकांनी विशेषतः साहित्यप्रेमी व वाङ्‌मय प्रेमींना आश्रय द्यावा ही विनंती

**गझल सम्राट सुरेश भट यांचा 'सप्तरंग'**

महाराष्ट्राचे लाडके गझल सम्राट सुरेश भट (रामकृष्ण मठाजवम, धनतोली, नागपूर - ४४००११) यांचा 'सप्तरंग' हा ५ वा काव्यसंग्रह (पृ) १२०, मूल्य रु. ८०/- प्रकाशक आहेत. श्री. भा. ले. कुलकर्णी, साहित्य प्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर - १२.

श्री. सुरेश भट १९४६ पासून काव्यलेखन करीत आहेत 'रुपगंधा' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९६२ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर साधारणपणे ८-१० वर्षांच्या अंतराने त्यांचे 'रंग माझा वेगळा, 'एल्गार' आणि झंझावात हे काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले.

**सप्तरंग**

या काव्यसंग्रहात एकूण ८० कविता व आकाशगंगा स्पंद १ व २ आहेत. 'आकाशगंगा' यासंबंधी ते म्हणतात,

गेल्या अनेक वर्षांपासून माझे हे आकाशगंगा नामक, कोणतीही कथावस्तू नसलेले दीर्घकाळ मी पूर्ण करण्यासाठी वाट पहात आहे. प्रत्यय आणि संवेदना हेच या एका गणवृत्तातील दीर्घकाव्याचे सर्वस्व.

''आकाशगंगेच्या निर्मितीची संकल्पना म्हणजे २५ कडव्यांचे ८ स्पंद एकूण एकाच गणवृत्तातील ४०० कडवी (स्पंद म्हणजे कंपन किंवा हालचाल, गती).''

**आशा भोसले यांचे भाष्य**

एकापेक्षा एक अविस्मरणीय गझल पेश करणारे सुरेश भट यांनी नुकतेच ७१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. साऱ्या महाराष्ट्राचे ते लाडके गजल सम्राट आहेत. सुप्रसिद्ध पार्श्वगायिका आशा भोसले म्हणतात, मलमली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे हे गाण माझ्या मनातून जातच नाही. सकाळी झोपडीतून किंवा कौलातून धूर बाहेर यावा आणि त्या धुराच्या पडद्यातून आरपार हिरवे डोंगर, दुधासारखे झरे झरझर खाली येताना दिसावेत. पण पातळ धुक्याच्या पडद्यामधून मोकळ्या केसात माझ्या तू जीव गुंतवावा. म्हणजे गुंता कधीच सुटू नये.... मला जीवनात जर खर आनंद कुठल्या गाण्याने दिला असेल तर तो केव्हा तरी पहाटे उलटून रात्र गेली' या गझलने दिला आहे.

आपल्या मनोगतात ते म्हणतात (माझिया जातीचे मज भेटो कोणी. ज्याला ते प्रस्तावना न म्हणता कैफियत म्हणतात) ''माझ्या ह्या काव्यसंग्रहात मी मराठीतील सर्व काव्यप्रकार समाविष्ट केलेले आहेत, नुसतीच गझल नव्हे. तर चक्क लावणी, अभंग आणि मुक्तछंद सुद्धा !....''

आजवरच्या त्यांच्या चारही काव्यसंग्रहांचे रसिकांनी जसे भरघोस स्वागत केले तसेच ह्या पाचव्या काव्यसंग्रहाचे ते करतील असा विश्वास वाटतो. सुरेश भट व प्रकाशक भा. कुलकर्णी यांचे अभिनंदन.

**श्री. शरद जोशी**

(ग्रंथप्रसारक)

□□□

# सार्वजनिक ग्रंथालय कायद्यातील बदल - काही अपेक्षा

ग्रंथालय कायद्याच्या संदर्भात ठाण्यातील काही मान्यवरांशी आमची ग्रंथालय शास्त्रातील विद्यार्थिनी अरुणा विचारे हिने संवाद साधला त्याचा हा संक्षिप्त वृत्तांत. - संपादक

१९६७ साली सार्वजनिक ग्रंथालयाचा जो कायदा ग्रंथालया संदर्भात केला गेला त्याला आज जवळ जवळ ३५ वर्षे झाली. आज या कायद्याचा पुनर्विचार करावा त्यात काही बदल करावा असे ग्रंथालयाशी निगडित असलेल्या सर्व मान्यवर व्यक्तींना वाटत आहे. याचे कारण म्हणजे काळाप्रमाणे लोकांच्या बौद्धिक क्षमतेत बदल होतो आणि म्हणूनच त्यांची बौद्धिक वृद्धी करण्यासाठी ग्रंथालये अधिक सक्षम हवीत. आणि यासाठीच बदलत्या काळाचा विचार करून ग्रंथालय कायद्यातील काही शिफारशी (नियम) बदलाव्यात असे विचार श्री. विनायक गोखले, प्रा. श्रीमती सिंधूताई पटवर्धन, श्री. पां. के. दातार, श्री. भा. शं. प्रधान यासारख्या सार्वजनिक ग्रंथालयांशी निगडित असलेल्या कार्यकर्त्यांनी मांडली आहेत.

ग्रंथालय कायद्यात बदल व्हावाच, पण सरकार जे अनुदान देते ते अतिशय तुटपुंजे आहे, असे मत, 'ठाणे मराठी ग्रंथालय संग्रहाचे अध्यक्ष श्री. पां. के. दातार यांनी मांडले. त्यांच्या विधानाला पुष्टी देत श्री. प्रधान यांनी अनुदान निदान खर्चाच्या ९०% मिळावे असे म्हटले आहे. आज मुंबईसारख्या शहरात जागा घ्यायची असेल तर लाखो रुपये लागतात. शासन इमारतीसाठी जो निधी देते तो अपुरा आहे. त्यामुळे त्यात वाढ व्हावी. असे त्यांचे म्हणणे आहे. शिक्षण कराप्रमाणेच ग्रंथालय कर ही लावावा. ग्रंथालयाला जी एकूण रक्कम मिळते त्याला अनुसरून कर लावला पाहिजे. जेणे करून गरज पडेल तेव्हा त्याचा उपयोग करता येईल.

कायद्यात 'फिरते ग्रंथालय' ही एक अतिशय महत्वाची योजना आहे. पण आजही ही योजना कागदावरच आहे. त्याचा फारसा प्रसार झाला नाही. वास्तविक पाहता जागेचा अभाव लक्षात घेता अशी 'फिरती ग्रंथालये' असणे फार गरजेचे आहे. या ग्रंथालयांचा खर्च 'जिल्हा ग्रंथालयाने' करावा अशी तरतूद कायद्यात आहे. पण याची जबाबदारी जिल्हा ग्रंथालयावर न टाकता तो एक स्वतंत्र विभाग ठेवावा, असे मत नगर वाचन मंदिराच्या कार्यवाह प्रा. सिंधुताई पटवर्धन यांनी मांडले आहे. दर ५००० वस्तीला एक छोटेसे ग्रंथालय सक्तीचेच करावे. व त्यात निदान २००० ते २५०० पुस्तके हवीत पण हे प्रत्येक ठिकाणी शक्य होईल असं नाही म्हणून 'फिरते ग्रंथालय' ही संकल्पना विकसित करण्याकडे शासनाने विशेष लक्ष द्यावे असे श्री. दातार यांना वाटते.

ग्रंथालयाने वर्षभरात साधारणतः दहा सांस्कृतिक कार्यक्रम करावेत अशी शिफारस कायद्यात आहे. पण सध्याच्या काळात टी. व्ही. व इतर करमणुकीच्या साधनांमुळे या कार्यक्रमांना फारसा श्रोतृ वर्ग नसतो. मग केवळ नियम म्हणून किंवा केवळ चौकशी होते म्हणून असे कार्यक्रम करण्यात काहीच अर्थ नाही असे स्पष्ट मत सिंधुताईंनी मांडले. त्या ऐवजी तो हक्क ग्रंथालयाला द्यावा व त्यांच्या गरजेप्रमाणे, वाचकांनुसार ग्रंथालयाने कार्यक्रम करावेत. ग्रामीण भागात त्यांना जीवनोपयोगी ठरतील असेच कार्यक्रम करावेत, असे ही त्या म्हणताता.

जुनी व जीर्ण पुस्तके तसेच फाटक्या पुस्तकांबाबत ठराविक नियम नाहीत. वाचकांना 'मोफत ग्रंथ' द्यावेत असा एक नियम कायद्यात आहे ही योजना आदर्श असली तरी वास्तवात उतरण्यास अनेक अडचणी

येतात. तसेच इमारत दुरुस्ती किंवा विशेष अनुदान देणे हे 'राज्य ग्रंथालय परिषदेने' शिफारस केल्यावर देण्यात येते. परंतु त्यातही ५०% रक्कम ग्रंथालयांनी भरावी हा नियम आहे. सद्यःस्थितीत सार्वजनिक ग्रंथालयांना ही रक्कम देणे शक्य नाही तेव्हा हा नियम अधिक लवचिक करावा.

'साखळी योजना' ही देखील एक महत्त्वाची योजना आहे. ग्रंथालयांचा विकास करण्यासाठी या योजनेचा विचार करणे आवश्यक आहे. साखळी योजने अंतर्गत जिल्हा, तालुका, विभाग, ग्रामीण भाग इ. सर्वच ग्रंथालये एकमेकांना जोडावीत व एकसूत्रीकरण व्हावे. म्हणजे वाचकांच्या मागणीनुसार एखाद्या ग्रंथालयात पुस्तक नसेल तर 'साखळी योजने' अंतर्गत ते पुस्तक त्या वाचकापर्यंत पोचवता येईल.

जुन्या कायद्यात काही त्रुटी आहेत. सेवकांचा पगार किती असावा, त्यांची पदे, श्रेण्या, रजा, त्यांचा प्रॉव्हिडंड फंड याबाबत काहीच तरतुदी नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष काम करताना बऱ्याच अडचणी निर्माण होतात. शासनाकडून मिळणारे अनुदान कमी असल्याने पगार देणे, पुस्तके खरेदी करणे हे शक्य होत नाही. अशा वेळेस एखाद्या संस्थेने स्वतंत्र शाखा काढली तर शासन त्याला स्वतंत्र अनुदान देत नाही. तेव्हा स्वतंत्र शाखेला स्वतंत्र अनुदान मिळावे. निदान अनुदानित शाळे एवढे अनुदान शासनाने दिले पाहिजे असे मत श्री. प्रधान यांनी मांडले.

कोणत्याही शहराचा ग्रंथालय हा सांस्कृतिक आत्मा असतो. म्हणून ग्रंथालये वाढवावीत ती जगवावीत या दृष्टीने शासनाने प्रयत्नशील असावे. पण आज ठाणे जिल्ह्यातील बरीचशी ग्रंथालये बंद पडलेली दिसतात. या मागची कारणे काय आहेत त्याची सरकारने कसून चौकशी करावी, असे मत श्री. विनायक गोखले यांनी मांडले. अशा ग्रंथालयांना जिल्हा ग्रंथालयाने मदत करावी असा उपायही त्यांनी सुचविला.

एकंदरित सार्वजनिक ग्रंथालये ही मानवाची बौद्धिक भूक भागवतात. आजच्या तरुण पिढीला अधिकाधिक वाचनाकडे वळवून त्यांचा व पर्यायाने देशाचा विकास साधण्यासाठी ग्रंथालये महत्त्वाची आहेत. अत्याधुनिक साधनांनी सुसज्ज अशी ग्रंथालये वाचकांना नेहमीच आकर्षित करतात, त्यामुळे शासनाने कायद्यात काहीच बदल करून नवीन कायदा व्यवस्थित राबवला तर ग्रंथालयांचा विकास होईल. श्री. व्यंकप्पा यांच्या एक सदस्य समितीचे कार्य त्या दृष्टीने चालू झाले आहे. त्यांनी सुचविलेल्या बदलांचे स्वरुप कालानुरुप असावे अशी अपेक्षा आज सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रातील कार्यकर्ते करीत आहेत.

**अरुणा विचारे**
हेमप्रभा, सुदर्शन कॉलनी,
कोपरी, ठाणे (पू) ४०० ६०३
दूरध्वनी : ५४३ ५३२८.

□□□

ऑगस्ट हा दिनविशेषांचा महिना होता. प्रत्येक दिवसाला सांस्कृतिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक महत्त्व, संदर्भ असणारा हा महिना.

यातील प्रत्येक दिवसावर स्वतंत्र लिहिता येईल. पहा विचार करून.

**झरोका**

# श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय ६ वा) ।। ध्यानयोगः ।।

*गीतेच्या पाचव्या अध्यायावरील लेखानंतर ध्यानयोग या सहाव्या अध्यायावर श्रीमती भिडे यांनी पाठविलेला लेख देत आहोत. - संपादक*

***(सर्व घराघरांसाठी घरातील सर्वांसाठी 'श्रीमद्‌भगवत गीता' सर्वांना सहज समजेल अशी)***

हर तऱ्हेने हर प्रकारांनी श्रीकृष्ण आपले मुद्दे अर्जुनाला पटवून, समजावून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे त्यात पुनरुक्ती आहे. बोलण्याच्या ओघात जो मुद्दा आला तो सांगितला गेला त्यामुळे मध्येच विषयांतरही झाले आहे.

शिक्षकाला विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरून त्याला आपले बोलणे समजले की नाही ते कळते, तसे कृष्णाला अर्जुनाच्या चेहऱ्यावरून वाटून तो सारखा सारखा समजावीतच राहिला आहे. अगदी क्षुद्र अशा व्यवहारातल्या गोष्टींपासून तो त्रिकालाबाधीत महान सिद्धान्तापर्यंतचे विषय यात हाताळले गेले आहेत. विश्वरूप दर्शनाचा महान चमत्कारही श्रीकृष्णाने दाखवला. हेतू एकच की युद्ध संपेपर्यंत अर्जुनाने मध्येच पुन्हा अवसानघातकीपणा करु नये, कच खाऊ नये. या महारावांनी उभे रहावे, युद्ध जिंकावे.

शिष्य आपले म्हणणे ध्यान देऊन एकाग्रतेने ऐकतो आहे. ज्ञान मिळवण्याची त्याची लालसा, जिज्ञासा पराकोटीला पोचली आहे, ती उत्तरोत्तर वाढते आहे हे गुरुच्या लक्ष्यात आल्यावर त्याला शिष्याला काय सांगू नि काय नको होते तसेच श्रीकृष्णाला झाले आहे.

कर्म म्हणजे स्वधर्म कर्म, त्यात मनाचा सहकार म्हणजे **विकर्म**. या दोन्हींचा प्रयोग करता करता **अकर्म** दिव्य स्थिती आपोआप प्राप्त होते (करून न केल्यासारखे प्रतीत होणे) कर्म, विकर्म, अकर्म मिळून साधना पूर्ण होते. हे आपण ५ व्या अध्यायात पाहिले; कर्म व संन्यास दोन्हीही एकरुपच आहेत हेही पाहिले. आता ६ व्या अध्यायात भगवंत पुन्हा तेच अर्जुनाच्या मनावर ठसावे म्हणून सांगत आहेत.

कर्मयोग्याचे आचरण संन्याशाच्या आचरणापेक्षा वेगळे दिसले (कर्मांची वाहुली नाचते) तरी खरे पाहता ते एकरुपच आहेत. पहाण्याचा दृष्टिकोण वेगळा आहे एवढेच. पाचव्यात जी अवस्था वर्णन केली आहे तिची साधने या सहाव्या अध्यायात पहावयाची आहेत. यात विकर्मांचे प्रकार सांगितले आहेत. म्हणजेच मानसिक साधन समजावून सांगत आहेत. 'सो ऽ हं' तू मीच आहे.' 'अहं ब्रह्मास्मि'. हे जीवा, तू देवच आहेस. त्यासाठी साधना कर. तू तुझ्यातल्या देवत्वाला पाहू शकशील. साधनेचे अनेक प्रकार आहेत. भक्तीयोग, ध्यानयोग, कर्मयोग, ज्ञान विज्ञान, गुण विकास, आत्मानात्मविवेक वगैरे. सर्व प्रकार एकाच मोक्ष पदाला जाऊन मिळणारे आहेत. त्यामुळे साधकाने योग साधना जरूर करावी.

गीता ग्रंथ हा फक्त साधू संतासाठी नसून सर्व साधारण जीवन जगणाऱ्या लोकांसाठी आहे. गीता ही तमाम दुनियेसाठी आहे. तिला जात, पात, धर्म, देश यांचे कशाचेच कुंपण नाही. हे गीता रहस्यात लोकमान्यांनी सांगितले. आपला व्यवहार शुद्ध व निर्मळ होऊन मनाचे समाधान, शांती कशी मिळवावी हे शिकवणारा परमार्थ गीता सांगते. विनोबाजी महंमदाचे उदाहरण गीतेला देतात.

पर्वत जर महंमदाकडे येत नसेल तर महंमद पर्वताकडे जाईल. आपला संदेश जड पर्वतासही कळावा ही त्याची इच्छा आहे, पर्वत अचल जड आहे म्हणून तो येणार नाहीच. मग त्याची वाट पहात न बसता महंमदच पर्वताकडे जाईल. तीच गोष्ट गीतेची. गरीब, दीन दुबळे, अडाणी कुणीही असो गीता त्यांच्याजवळ जाईल त्यांना जवळ घेईल.

'गीताई' माऊली माझी। मी तिचे लेकरू
पडता रडता घेई। उचलोनि कडेवरी॥-विनोबाजी

मनुष्याने आपला व्यवहार शुद्ध करून परमोच्च समाधान, शांती मिळवावी हीच गीतेची इच्छा आहे. स्वतःला क्षुद्र जीव समजून मनःशक्ती मारू नका. कल्पनेचे पंख छाटू नका. चंडोल पक्षी रोज प्रातःकाळी सूर्याला गाठीन म्हणून मनाशी निश्चय करतो. तशीच हिंमत ठेवा, हे ध्येय आकांक्षा, जिद्द बाळगाल तर साधनेची सुरुवात कराल.

तैसे गीतार्थाचे सार। जे विवेक सिंधूचे पार।
नाना योगविभवभांडार। उघडले कां. ॥६-११॥

सहावा अध्याय गीतार्थाचे सार व योगाचे वैभव, भांडारच आहे असे ज्ञानदेव म्हणतात. एकाच गावाला दोन निरनिराळ्या मार्गांनी जाता येते किंवा एकाच व्यक्तीला निरनिराळ्या नावांनी हाका मारतात. किंवा एखाद्या झाडावर चढून जाता येते, उडून जाता येते तसे निष्काम कर्मयोग व सांख्य-योग ही नावे जरी निराळी असली तरी ते मार्ग एकाच ब्रह्मपदाला नेऊन पोहचवतात. देहाचा मिथ्या अभिमान समूळ गळून पडला की परमात्मा कोठून बाहेरुन यावयाचा नाही. तूच स्वतः परमात्मा आहेस हे तुला अनुभवाला येईल. या अद्वैत स्थितीत सुखदुःखादी द्वंद्वे नाहीशी होऊन विश्वातील सर्व भिन्न भिन्न आकाराचे पदार्थ ही सृष्टी एकाच परब्रह्म रुपी सोन्याचे घडलेले अलंकार आहेत. अशी खोल दृष्टी त्याला येईल.

आपल्यालाही अशी स्थिती प्राप्त होण्यासाठी काय केले पाहिजे ही तीव्र जिज्ञासा अर्जुनाच्या मनात उत्पन्न झाल्यामुळे भगवंत त्या मार्गाचे सविस्तर विवेचन या अध्यायात करीत आहेत.

आपले कर्तव्य कर्म (स्वधर्म कर्म) जो निष्कामपणे करतो तोच संसारी व तोच योगी. गृहस्थाश्रमाचा व अग्निहोमाचा त्याग करणारा व काहीही कर्मे न करणारा संन्यासीही नव्हे व योगीही नव्हे. अर्जुना ज्याला संन्यास म्हणतात तोच कर्मयोग समज कारण वासनांचा संन्यास (त्याग) केल्याशिवाय कोणीही खरा कर्मयोगी होऊ शकत नाही. जो इंद्रियभोग व कर्मांच्या ठिकाणी आसक्त न होता वासनांचा त्याग करतो त्यालाच 'योगारुढ' (योगावर आरुढ झालेला) योगाभ्यासी म्हणतात.

आणि मी माझें ऐसी आठवण।
विसरलें जयाचे अंतःकरण।
पार्था तोचि संन्यासी जाण। निरंतर॥
आता गृहादिक आघवे।
हे काहीच न लगे त्यजावे।
जे घेते झाले स्वभावे।
निःसंग म्हणवुनि॥

ज्ञानेश्वरीतील ज्ञानदेवांच्या या ओव्या मी पुन्हा पुन्हा सांगते याचे कारण श्रीकृष्णाला जसे पार्थाच्या मनावर आपले मुद्दे ठसवायचे आहेत म्हणून तो पुनःपुन्हा पुनरुक्ती करतो तसेच लोकांच्या मनात ठसण्यासाठी मी ही पुन्हा त्याच ओव्या उधृत करते.

मन एकाग्र झाले तर सामर्थ्य कधीही कमी पडणार नाही. मनुष्य जसजसा वृद्ध होत जातो तसतसे त्याचा देह कमजोर होत जातो पण मन टणक, खंबीर, परिपक्व होत गेले पाहिजे. फळाचेही असेच आहे नाही का ? फळ हिरवे असते ते पिकते, सडते, कुजते नाहीसे होते पण आतले

'बी' मात्र टणक होत जाते. तसे माणसाचे झाले पाहिजे. यासाठी एकाग्रता पाहिजे. विनोबाजी एकाग्रता कशी असते याबद्दल एक दोन गोष्टी सांगतात. एका मुसलमान साधुला बाण लागतो. त्याला असह्य वेदना होत असतात. पण बाण काढायला गेलं की त्याला जास्तच वेदना होत. त्यावेळी अॅनेस्थिशिया किंवा क्लोरोफार्म नव्हता. त्यावेळी एकाने सुचवले, हा साधु ध्यानाला बसला की त्याचा बाण काढा, आणि खरंच तो ध्यान लावून बसल्यावर बाण काढला तर त्याला कळले देखील नाही. केवढी त्याची एकाग्रता होती पहा! नेपोलियन युद्ध भूमीवर युद्धाची व्यवस्था लावून गणिते सोडविण्यात मग्न होत असे. खलिफा उमर लढाई चालू असताना जर प्रार्थनेची वेळ झाली तर रणांगणात गुडघे टेकून प्रार्थनेत मग्न होई.

ही एकाग्रता सामान्यांना साधत नाही कारण आसन घालून सांगितल्याप्रमाणे शरीर स्थिर केले तरी मनातील विचार चक्र सुरुच राहते. आपल्या आत्म्याची ज्ञान शक्ती आपण क्षुल्लक गोष्टीत खर्च करतो. कथा पुराण ऐकतांना, अभ्यास करतांना आम्हाला झोप लागते. पण पडल्या पडल्या आम्हाला झोप लागत नाही. चिंता, काळज्या यांनी मन व्याप्त होऊन जाते. एकीकडे शून्याग्रता तर दुसरीकडे अनेकाग्रता. एकाग्रता कोठेच नाही. मनुष्य इतका इंद्रियांचा गुलाम आहे. मागे चोराला शिपाई चारी बाजूनी वेढून धरून नेत आहेत. मग राजाच्या चारी बाजूने शिपाई बरोबर जात आहेत. एक लहान मुलगा ही दोन्ही दृश्ये पाहतो व वडिलांना विचारतो. वडिल पहिला चोर आहे व तो शिप्यांच्या ताब्यात आहे सांगतात दुसरा राजा असून शिपाई त्याच्या आज्ञेत आहेत असे सांगतात. ही गोष्ट सांगितली होती तुम्हाला आठवत असेल. मग आपण इंद्रियांचे गुलाम व्हायचे की इंद्रियांना आपले गुलाम करायचे! म्हणजे चोर व्हायचे की राजा! हो आपणच ठरवायचे.

डोळे बंद केले तर झोप लागते, उघडे ठेवले तर बाहेर लक्ष जाते. (रजोगुण) म्हणून मधली स्थिती डोळे अर्धोन्मिलित (अर्धे मिटलेले व अर्धे उघडे) असे ठेवायचे. गीतेत एक ज्ञानमार्ग व दुसरा कर्ममार्ग सांगितला आहे. ज्ञानमार्ग (संन्यास) श्रेष्ठ पण ज्या अज्ञ, सामान्य लोकांना ज्ञानमार्ग साधणार नाही त्यांना कर्ममार्ग सांगितला आहे अशी सर्व सामान्यांची समजूत आहे. पण 'संन्यासी' म्हणजेच 'योगी' व 'संन्यास' म्हणजेच 'योग' असे या अध्यायात सुरुवातीलाच स्पष्टपणे सांगितले आहे. भगवंतांनी, हे लक्षात घ्या. भगवंताला संन्याशाचे ज्ञान हवे कर्म त्याग नको, योग मार्गातील कर्म शीलता हवी पण भोगासक्ती नको. ज्ञानमार्गाला कर्माची जोड आवश्यक व कर्मयोगाला अनासक्ती आवश्यक. 'ज्ञानाबिना कर्म आधळं व कर्माविना ज्ञान पांगळं' आहे ज्ञान व कर्म या दोन्ही पंखांनी उडायचं आहे हे विसरू नका.

कर्मयोग्यास योगाभ्यासाची आवश्यक्ता असते. त्यासाठी इंद्रिय भोगातून मन काढून घ्यायला हवे. ते कसे घ्यावे हे भगवंत पद्धशीर पायरी-पायरीने सांगतात. हे बघा योग्यांची कुठे खाण नसते किंवा ते आकाशातून पडत नाहीत किंवा अमुक तमुक धर्म, जाती, कुळात ते जन्म घेतात असे ही नाही. तर मनोनिग्रहाने, निर्धाराने अभ्यास करणारा कुणीही योगी होऊ शकतो. त्यासाठी आहार विहार माफक हवा. म्हणजे अति खाणे किंवा मुळीच न खाणे, अति झोपणे, मुळीच न झोपणे हे दोन्ही वाईटच. त्याला योग साधत नाही. जीवनात समतोल हवा. यासाठी एक लक्षात ठेव की आपणच आपला हितकर्ता व शत्रू बनत असतो. कारण ज्याने मन जिंकले तो स्वतःच स्वतःचा उद्धार करतो, हितकर्ता होतो व ज्याने मन जिंकले नाही तो स्वतःच स्वतःला अधोगतीला नेतो व स्वतःचा शत्रू बनतो.

दुःखाच्या संयोगाचा वियोग जेथे असतो तो योग. मी दुःखाचा संयोग कुठे कुठे होतो हे ५ व्या अध्यायात सांगितले आहे. तुला समजलं नसेल तर पुन्हा ऐक दुःखाचा संयोग म्हणजे इंद्रिये व विषय यांचा संयोग. त्यांचा जिथे वियोग तो योग असतो. योग म्हणजे चित्तवृत्तींना आवरणे.

आणि योग आचरणारांनी आळस वर्ज्य करायला हवा. भगवंतानी आळस वर्ज्य कराल तरच योग साधेल हे बजावून सांगितलेय गीतेत. रामदासस्वामींनी दासबोधात आळसावर अनेक समासात कोरडे ओढलेले आहेत.

अर्जुना, 'दुःख संयोग वियोग' ही अवघड परिभाषा तुला समजली नसेल आणखी सोपे करून सांगतो. प्रथम वासना व आसक्तीचा त्याग, दुसरं इंद्रीयांना ताब्यात ठेवायचं. तिसरं स्थिर बुद्धीने चंचल मनाला आत्म्याच्या ठिकाणी पुन्हा पुन्हा आणून रोवून ठेवणे. रांगणारे मुल कुठेही रांगत जाते पण ते भलतीकडे गेले तर आपण त्याला पुन्हा उचलून वाटेवर आणून ठेवतो ना! तसेच मनाला ठेवायचे. इतर कुठल्याही विषयाचे विचार-विकार मनात आणायचे नाहीत.

इथवर आल्यावर योग्याने योगाभ्यास कसा करावा, ध्यान कसे लावावे हे पण भगवंत बारकाईने सांगतात. श्लोक १० ते १५ व १८ ते २१ यात भगवंताने योग्याने एकान्त स्थळी बसून सतत आत्मध्यान करावे. यासाठी अरण्यात जाण्याची जरुर नाही. घरच्या घरी सुद्धा हे गृहस्थाश्रमी माणसाला करता येईल. त्यासाठी सारे निजतील तेव्हां उत्तर रात्री व भल्या पहाटे एकान्तात योगाभ्यास करावा. 'इच्छा असेल तिथे मार्ग सापडतो.' नंतर शुद्ध भूमीवर (शक्यतोवर एका जागी नेहमी बसावे.) दर्भासन घालून त्यावर मृगचर्म व नंतर धूतवस्त्र घडी करून घालावे. अति उंच किंवा सखल नाही अशा जागी आसन घालून बसावे. वज्रासनात बसावे असे ज्ञानदेव म्हणतात पण त्यांचे वज्रासन कठीण आहे ते शिकल्याशिवाय जमणारे नाही. पद्मासन किंवा सिद्धासन, सुखासन सुद्धा चालेल. पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख बसावे. शरीर व डोके आणि मान सरळ रेषेत अचल ठेवावी. इतरत्र पाहू नये. नंतर आत्म्याचे ठिकाणी स्थिर करून योगाभ्यास करावा. अधिकाधिक वेळ ध्यानस्थ बसण्याचा प्रयत्न करावा. ब्रह्मचर्य, निश्चल, निर्भय शांत व सावध होऊन मनास वश करून माझ्या ठिकाणी चित्त लावावे. व आत्म्यातच तद्रुप व्हावे. याप्रमाणे आत्म्याला स्वस्वरुपी लावणारा व स्वाधीन मनाचा योगी परमात्म्याचे ठिकाणी परमानंदाची पराकाष्ठा असलेली म्हणजे उत्कट आनंद असलेली शांती मिळवतो. त्यालाच 'योगयुक्त' म्हणतात. यावेळी योग्याचे चित्त निर्वात स्थळी असलेल्या निष्कंप ज्योतीप्रमाणे शांत, स्थिर होते. या अवस्थेत आपण स्वरुपदर्शन घेतो. नि स्वरुपानंदातच रमून जातो. हा स्वरुपानंद अतुलनीय अवर्णनीय अतिंद्रिय असतो. तो बुद्धीने आकलन होतो. (इंद्रियगम्य नाही.)

५ व्या ध्यानयोगाची प्रस्तावना भगवंतानी केलीच आहे. अंतरात आत्मानुभव आला तरच बाहेर ब्रह्मानुभव येईल. सर्वत्र समदर्शन होणे म्हणजे ब्रह्मानुभव. वस्तू वस्तूतील (विश्वातील) सूक्ष्मतम तत्त्व म्हणजे ब्रह्मतत्व. या ब्रह्मदर्शनास प्रथम आत्मानुभव येणे आवश्यक. आणि त्यासाठी योगाभ्यास आवश्यक. (ध्यानयोग) विश्वातील विविधता एकाच ब्रह्मतत्वाने गुंफलेली आहे. परमात्माच विविध रुपाने नटला आहे. 'अनंतरुपे, अनंतवेषे पाहिला म्या त्यासी' अनंत रुपात अनंत वेषात मी परमेश्वराला पाहिलेय असे ज्ञानेश्वर म्हणूनच म्हणतात, जे जे पहातो ते परमेश्वराचेच रुप आहे. ही भावना हवी. अहंभाव गेल्यावरच हा अनुभव येऊ शकतो. अहंकार हा आपल्याला दुसऱ्यापासून वेगळे करतो. आत्मानुभव दुसऱ्याशी एकरुप करतो. एकत्वाच्या दर्शनावाचून समाज, राष्ट्र, विश्व या भावना जाग्याच होणार नाहीत.

अहंकार विसर्जनाची प्राचीन पद्धत म्हणजेच योगाभ्यास. तो करू इच्छिणाराने प्रथमतः आपले जीवन कमालीचे नियमित, प्रमाणबद्ध, विनम्र करणे आवश्यक आहे. शरीर स्वस्थ नसेल पोट किंवा दात दुःखत असेल तर शरीराची जाणीव राहील. मग ध्यान कसे लागणार? म्हणून शरीर स्वस्थ हवे. स्वस्थ शरीर असून नसल्यागत होते. (Bodylessness) मग वरील प्रमाणे बसून आसन घालून

ध्यान करावे. मन निर्विकार निर्विचार करावे. दृष्टी नासाग्रावर स्थिर करावी. हे सर्व अतिशय अवघड आहे, या विचारशून्य अवस्थेलाच 'समाधी' म्हणतात. इथेच आत्मदर्शन होते. नासाग्रावर दृष्टी स्थिर होत नसेल तर श्वासावर ध्यान केंद्रित करावे. श्वास घेतांना 'सो' व सोडतांना 'हं' ध्वनी ऐकावा. या जपाला अजपाजप म्हणतात. असे झाले की निष्कंप ज्योतीचे वा प्रकाशाचे दर्शन होते. तेच आत्मदर्शन, स्वरुपदर्शन असे ज्ञानदेव सांगतात. गीतेत ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तीयोग, ध्यान योग असे अलग अलग चार योग सांगितले नाहीत. अर्जुनाला ६व्यात 'योगी' हो म्हटलेय. ९व्यात 'मन्मना भव मद्भक्तो' माझा भक्त हो म्हटलेय. ४थ्यात कर्मयोग आचरण्यास सांगितलेय. तर ११व्यात ज्ञानयोगाचा अनुभव दिलाय. म्हणनू हे चार स्वतंत्र मार्ग नाहीत. तर एकाच जीवनाला या चारी मार्गांची गरज आहे.

पतंजलींच्या योगशास्त्राच्या ८ पायऱ्या आहेत. त्यांना 'अष्टांगयोग' म्हणतात. यम-नियम-आसन-प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान धारणा-समाधी ही आठ अंगे. आता गीता व पतंजलीचे योगाची एकत्र सांगड घालून बघू.

| **गीता** | **पतंजली** |
|---|---|
| आहार-विहार-आसन-संयम | यम-नियम-आसन |
| मन आवरावे, वश करावे | प्रत्याहार |
| नासाग्रावर दृष्टी ठेवावी | ध्यान |
| चित्त शांत होते | धारणा |
| आत्मा आत्म्यास पाहतो | समाधी |

ध्यानाने ब्रह्मानुभव येतो. व्यापकता आनंदाचा अनुभव येतो. हा अनुभव येणे हाच ब्रह्माचा जीवनाला स्पर्श होय. मन शांत होते (रजोगुण जातो). काम-क्रोध चंचलता नष्ट होते. हेच ब्रह्माशी ऐक्य. हे कसे ओळखायचे ? त्या योग्याला कारणाशिवाय अमाप आनंद होतो.

बिनोबाजी मनाला चिंध्याचे गोठोडे म्हणतात. एक एक चिंधी काढून फेकली की गाठोडे नष्ट होते. ध्यानाने पाप नष्ट होते. म्हणजे चांगल्या वाईट विचारांनी मनावर ओरखडे उमटतात. ते मनच का एकदा ध्यानात निमग्न झाले की साराच आनंदी आनंद. भगवंत म्हणतात जो मला परमात्म्याला सर्वत्र (सर्व भूतात) पाहतो व सारे माझ्यात सामावलेले पाहतो त्यास मी दृष्टीआड होत नाही व तो मला. आधुनिक शास्त्रज्ञ म्हणतात 'There is Universe in atom and there are atoms in Universe.' एकच एक आत्मतत्व सर्वत्र सामावलेले आहे' (सर्व जड वस्तू वस्तूत) ही दर्शनाची पहिली पायरी. एकच एक परमात्मतत्व अनेक रुपांनी नटले आहे ही दुसरी पायरी. म्हणजे 'समता' ही पहिली पायरी 'एकता' ही त्यावरची पायरी ! परमात्म्याचे दर्शन म्हणजे एकत्वाचे दर्शन. उपनिषदात म्हटले आहे की ठिणगी आगीला न आग ठिणगीला विसरू शकत नाही. (आग-ठिणगी एकमेकांना दुरावत नाही तसेच आत्मा परमात्मा) आपण व सारे विश्व एकाच परमात्म्यात वसत आहोत हा सर्वश्रेष्ठ योगानुभव. त्यामुळे परमात्म्याची तो भक्ती करतो. असा योगी सारी कार्ये करीत असला तरी तो परमात्म्याशी एकरुपच असतो. म्हणजे ज्ञान. व सर्वांवर प्रेम करणे ही भक्ती. सर्व कार्ये या तादात्म्यातून व प्रेमातून करणे हे कर्म, या सर्वांचा योग येथे साधला आहे. योगी अरविंद याला 'पूर्णयोग' म्हणतात.

आपणासी चिमोटा घेतला। तेणे जीव कासाविस झाला। आपणावरूनि दुसऱ्याला। वोळखित जावे ॥ रामदास स्वामींनी म्हटल्याप्रमाणे योगी आपल्या सारखीच सुखदुःखे इतरांनाही आहेत हे जाणतो. व तसे बाह्य जगाकडे पाहतो त्याची अंर्तदृष्टी द्वंद्वातीत असते. (सुख दुःखे समान) आत्मज्ञान व विश्वज्ञानाने तृप्त. जितेंद्रिय. त्याला दगड माती सोने समान वाटतात. समबुद्धी निरिच्छ असा हा योगी अत्यंत श्रेष्ठ. शास्त्रही विद्युत अणु सारखेच आहेत सांगते. शास्त्राचे जे संशोधन ते योग्याचे दर्शन.

समदर्शन - परमात्मदर्शन - योगसिद्धी. ही सिद्धी प्राप्त झाल्यावर कोणतेही दारुण दुःख मन विचलीत करु शकत नाही. हे सर्व ऐकल्यावर अर्जुनाच्या मनात शंका आली तो भगवंताला म्हणतो, 'तू समदर्शन योग मला सांगितलास ते ठीक आहे पण या अवस्थेत मन एका जागी फार काळ टिकेल असे वाटत नाही. कारण मन अत्यंत चंचल आहे, मोठे गूढ आहे, बलवान आहे. त्याला एका जागी बसवणे म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्यासारखे आहे.'

भगवंत म्हणतात 'अर्जुना, तू म्हणतोस ते मान्य केले तरी अभ्यासाने व वैराग्याने मन वश करता येते. जे संयमी नाही त्याचे मन ताब्यात नसते. त्यांना योग साधणे अवघड तर आहेच पण अशक्य नाही हे ही तितकेच खरे आहे. योग सामर्थ्यापुढे मनाचे सामर्थ्य फिके पडते. योगाच्या अखंड अशा अभ्यासाने चंचल मनही वळणीवर येते. स्थिर होते. फक्त साधकाने निराश होऊन प्रयत्न सोडू नयेत. सिद्धी ही तावडतोब मिळणारी गोष्ट नाही. पैसे दिले की वस्तू हातात. तेवढे हे सहजसोपे व सहज साध्य नाही. अर्जुन त्यावर विचारतो 'एखाद्या व्यक्तीने श्रद्धेने, निश्चयाने दृढ प्रयत्न प्रदीर्घ काळ चालू ठेवले (साधना चालू ठेवली) पण अंतिम ध्येय गाठण्यापूर्वीच त्याचे आयुष्य संपले तर काय? मग त्याला धड ना संसार धड ना परमार्थ असे तर होत नाही? ढग फुटून नाहीसा होतो तसे त्याचे जीवन फुकट जाते का ? याचे उत्तर भगवंता तुझ्याशिवाय कोण देणार ? म्हणून तुलाच विचारतो.'

'त्याला इहलोकी वा परलोकी विनाश नाही. मुळीच नाही बरं अर्जुना, तो स्वर्गात पुण्यवंतांच्या लोकात अनेक वर्षे राहून नंतर एखाद्या ज्ञानवंत कुलीन घराण्यात जन्म घेतो. त्यावेळी या जन्मी पूर्वजन्मीचा योगाभ्यास त्याला लगेच प्राप्त होतो. व तेथून तो पुढील वाटचाल करतो. नि अंतिम फळ प्राप्त करतो.

''धन्य भागवत धन्य धर्म तो सर्व व्यापी हरी सीताराम निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ नामदेव, तुकाराम ॥'' हे सर्व संत याचेच उदाहरण होते. योगाभ्यास अनेक जन्म करावा लागतो. प्रयत्नाने त्यास परमगती प्राप्त प्राप्त होते व त्यांची साधना फलद्रुप होते. चांगदेव चौदाशे वर्षे जगला असे आपण म्हणतो पण याचा अर्थ असा की प्रत्येक जन्म त्याला आठवत होता व प्रत्येक जन्मात त्याने योगाभ्यास केला. तरी सुद्धा तो 'कोराच राहिला'. बऱ्या वाईट प्रसंगांचे ओरखडे त्याच्या मनावर उमटले नाहीत. त्याचे मन स्वच्छ राहिले त्यामुळे ज्ञानाची अक्षरे त्यावर लिहिता आली.

योगी अरविंद यांची गोष्ट सांगतात. त्यांच्या वडिलांनी गौतम बुद्धाला जसे बाहेरच्या जगाच्या संपर्कापासून दूर ठेवले होते. (जगातील दुःखापासून) तसेच यांना भारतीय संस्कार न व्हावेत म्हणून व इंग्रजी संस्कृतीत वाढावा म्हणून इंग्लंडमध्ये ठेवले होते तरी पूर्व जन्मीच्या संस्कारामुळे की काय ते योगाभ्यासाकडे आकृष्ट झाले. व महान योगी झाले, भारतीय संस्कृतीचे उद्गाते झाले. भगवंताच्या बोलण्याचीच ही प्रत्यक्ष उदाहरणे नव्हेत का?

४६-४७ श्लोकात अखेरीला भगवंतांनी ज्ञानी व तपस्याहून योगी श्रेष्ठ असे म्हटले आहे. म्हणून अर्जुना तू योगी हो. असे ते पुन्हा पुन्हा म्हणतात.

बारा वर्षे आवडीच्या विषयाचे अध्ययन - म्हणजे तप- ते करणारा तपस्वी शास्त्राचे अध्ययन करणारा - ज्ञानी

अशा ज्ञानी, तपस्व्यापेक्षा सकामकर्मे करणाऱ्या कर्मठांपेक्षा योगी श्रेष्ठ. कारण योग्याची बाह्यकर्मे समृद्धी व चित्तशुद्धीसाठी केलेली असतात. ज्ञानी तपस्वी हे जगाचा उद्धार करणारे स्वतःचा मात्र उद्धार करीत नाहीत. म्हणून या सर्वांपेक्षा योगीच श्रेष्ठ व जो योगी माझ्यात अंतरात्मा स्थापन करुन (म्हणजे मन परमेश्वराकडे लावून) मलाच

निरंतर भजतो तो योगी मला श्रेष्ठतम वाटतो. कारण अंतरात्मा परमात्म्यात स्थापन करणे म्हणजे आपला, अहंकार विश्वात विरघळवून टाकणे. (म्हणूनच 'तुका आकाशाएवढा' होऊ शकतो.) आणि 'जे जे भेटे भूत। त्यासी मानी भगवंत,' 'सर्वभूती परमेश्वर' अशा श्रद्धापूर्ण प्रेमभावनेने सर्वांशी वागणे म्हणजेच निरंतर भजणे. या व्यवहारानेच सर्वत्र व्यापून उरलेल्या परमात्म्याचे दर्शन व स्मरण त्याला होतेय हे सिद्ध होते. मग तो मला व मी त्याला कधीही दृष्टी आड होत नाही.

परमेश्वर सर्वांकडे आहेच. त्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न कशाला करायला हवेत! परंतु आपल्या अंतःकरणात तो प्रवेश करू शकत नाही कारण विकार व अहंकार त्यात ठासून भरलेले असतात. म्हणून चित्तशुद्धीसाठी प्रयत्न करावे लागतात. बघा सूर्य उगवतो तो सारे विश्व उजळून टाकतो. घराघरात त्याची किरणे प्रवेशतात. घरदार प्रकाशाने भरून जाते. पण ज्या घराची दारे खिडक्या बंद. ते करंटे. त्याच्या घरात प्रकाश कसा प्रवेशणार ! तिथे अंधारच राहणार हो की नाही ? तसेच आपले अहंकार विकार परमात्म प्रकाशाला आत शिरू देत नाहीत. अहंकार गळून पडला विकारांवर विजय मिळवला की त्या दिव्य प्रकाशाने अंतर्मन उजळून निघेल. त्यासाठी एकाग्रतेने योग करावा.

योगाचे तीन प्रकार - आसन, प्राणायाम, ध्यान. यम, नियम - ही व्यक्तीची पूर्व तयारी.

प्रत्याहार - धारणा - समाधी : ही ध्यानाची उत्तरोत्तर श्रेष्ठ अवस्था.

आता विकार तीन प्रकारचे असतात ते पाहू. १) शारीरिक २) मानसिक ३) भावनिक.

व्यायामाने स्नायू मजबूत होतात पण योगाने अंतःस्त्रावी ग्रंथींना स्वास्थ्य लाभते व त्या कार्यक्षम होतात. म्हणून योगासन उत्तम.

कामक्रोध या मानसिक विकारांवर उपचार म्हणजे प्राणायाम. या विकारात आपला श्वास तीव्र होतो. म्हणून प्राणायमाने जर श्वास आपण नियमित व नियंत्रित केला तर विकार ही शांत व सौम्य होतील. आपण म्हणतो, स्वभावाला औषध नाही. पण योगाने आसन, प्राणायम व ध्यान ही त्यावर औषधे शोधली आहेत.

भावनिक विकारांवर ध्यान सर्वोत्तम. तीव्र भावनावेगाने मनाची शांती ढळते. शारीरिक, मानसिक रोग बळावतात. म्हणून म्हणतात ना की 'मन चंगा तो कठोतीमें गंगा' ध्यानाने मन शांत होते. चंचल मन अचल होते. म्हणून चित्तशुद्धीसाठी योगाभ्यास प्रत्येकाने जरूर करावा. त्यासाठी मनाची एकाग्रता हवी. व एकाग्रतेसाठी अभ्यास व वैराग्य ह्या दोन गोष्टी हव्यात. अभ्यास म्हणजे निग्रहाने, सातत्याने एखादी गोष्ट करणे. स्वरूपाचे ठिकाणी स्थिर राहण्याचा पुन्हःपुन्हा प्रयत्न करणे म्हणजेच अभ्यास. त्रिगुणांचे प्रेम, आसक्ती सोडणे, चांगल्या वाईटाचे चिंतन थांबवणे, भूतकाळ विसरणे म्हणजेच वैराग्य. संन्यास, भगवी वस्त्रे, संसार त्याग, भिक्षाटन, अरण्यात वास म्हणजे वैराग्य नव्हे.

योगाचे चार प्रकार गीतेत सांगितले आहेत. ज्ञानयोग, कर्मयोग, पतंजलीचा ध्यानयोग व भक्तीयोग. हे चारी मार्ग मोक्षाला जाणारेच आहेत. हा ६ वा अध्याय ध्यान योगाचा आहे. या ध्यानाच्या आणखी काही पद्धती आहेत. त्याची नुसती नावे पाहूया. १) सूर्यध्यान २) चंद्रमाध्यान ३) ज्योतिर्ध्यान ४) आकाशध्यान ५) प्रतिबिंबध्यान ६) मूर्तीध्यान ७) जपध्यान ८) श्वासावर लक्ष केंद्रित करून ध्यान (त्यास शब्दशून्य जप किंवा अजपाजप म्हणतात. निरालंब (आधार न घेता) ध्यान. यात वस्तूशून्य, शब्दशून्य, अहंशून्य (कठीण) १०) कला साधना (हा योगाभ्यासच असे योगी अरविंद म्हणतात.)

ज्ञानदेवांनी एक वेगळा विलक्षण विचार मांडलाय - एकले नि स्थिरावे। वरी काळा आले स्वभावे। ना तरी

घालावे। मोकळुनि॥ या वरील पद्धतींनी मन स्थिर झाले तर ठीकच नाहीतर मन खुशाल मोकळे सोडावे. मग ते जेथे जेथे भटकत जाईल तेथून ते आत्मस्वरुपावर स्थिर होईल. कारण आत्मा आत व बाहेर ही आहेच. म्हणून ध्यानाला मन कोंडले पाहिजे असे नाही. प्रकृतीच्या अंती 'शिवुचि भेटे' (शिवु- चैतन्य आत्मरुप) असे ते अमृतानुभव या ग्रंथात म्हणतात.

मन बाहेर सोडायचे तर ते 'त्रिगुणात' आणि 'द्वंद्वात' अडकण्याची भीती असते. त्यासाठी कलामाध्यम उत्कृष्ट ! कलाभ्यासात मन कोंडावे लागत नाही. ते बाहेर पडू शकते. पण त्रिगुणात आणि द्वंद्वात न अडकता एकाग्र होऊ शकते. यापैकी कोणतीही पद्धती अवलंबावी पण प्रत्येकाने योगाभ्यास जरुर करावा.

पशुपक्ष्यांप्रमाणे जगाला भिऊ नका, सांभाळणारा वर ईश्वर आहे त्याच्यावर भार टाकून निश्चिंत रहा. प्राणी पक्षी सारखे जागृत व सावध असतात. नजर भिरभिर पाहते. सिंह चार पावले चालला की मागे वळून पाहतो. (त्याला सिंहावलोकन म्हणतात.)

परमात्म्याचे चैतन्य झऱ्यात, ताऱ्यात, वाऱ्यात, मनात सगळीकडे आहे. झरा अखंड वाहतो. समुद्र अखंड 'ॐ' चा जप करतो. अखंड कर्म करतो. लाट येते जाते, जाते येते. तिला क्षणभर विश्रान्ती नाही. समुद्राच्या लाटा उसळतांना पाहून मन उचंबळते. तर ज्ञान प्रेमाचा अथांग हृदयात उसळल्यावर मी किती नाचेन ! हा हृदयातला समुद्र पहायला अनुभवायला शिका. विनोबाजी स्वानुभवाने हे सांगतात.

ध्यानयोग - १) चित्ताची एकाग्रता २) मोजक्या क्रिया ३) समदृष्टी या तिन्हीला अभ्यास व वैराग्य हे उपसाधन हवे. या पाची गोष्टी म्हणजे - ध्यानयोग.

काम क्रोधाचे तण उपटून काढणे - विध्वंसक (वैराग्य) गोडी वस्तूत आहे असे समजणे चुकीचे आहे गोडी आत्म्यात आहे. आत्म्यातील गोडी वस्तूत ओता. मग फळ जास्तच गोड लागेल. प्रिय व्यक्तीच्या हातचा चहा (साखर विसरली घालायला तरी) गोड का लागतो ? गोडी बाह्य वस्तूत नाही. माझ्या जवळच्या आत्म्यात आहे. अशी भावना करीत गेल्यास वैराग्य येते. मारुतीला सीतेने दिलेल्या मोत्याच्या माळेत राम दिसला नाही तो राम त्याच्या हृदयात होता.

भगवंतानी अर्जुनाला योगाची ओळख करून दिली. ते प्रेमाने रसपूर्ण, ओजस्वी वाणीने बोलत होते. अर्जुनासारखा श्रोता ते ग्रहण करीत होता, त्यामुळे उत्स्फूर्तपणे, आनंदाने ते तसेच पुढे बोलत राहिले.... (ते पाहूया, सातव्या, पुढील अध्यायात - ('ज्ञानविज्ञानयोगः')

**श्रीमती आशा भिडे**

बी/१ विजय अपार्टमेंटस्

'आराधना' टॉकीज जवळ

ठाणे (प) ४०० ६०२

दूरध्वनी : ५४१ ०१४०

❑❑❑

**दिशा**

वार्षिक वर्गणी रु. २५०/-

संपर्क - ५४२ ३२७०

# 'कहाणी तंबाखूची'

*गुटखा बंदीच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आजच्या तरुण विद्यार्थ्याला तंबाखू वर लेख तयार करावास वाटणे महत्त्वाचे आहे. वांदोडकर विज्ञान महाविद्यालयात एफ. वाय. बी. एस्. सी त शिकणाऱ्या गीतेश ने ग्रंथालयातील पुस्तकांचा संदर्भ घेऊन हा लेख बनविला आहे. - संपादक*

त्या दिवशी एक आश्चर्यकारक पण चांगली बातमी कानावर आली; गुटखा सेवनावर महाराष्ट्र सरकारने बंदी घातली. ऐकून थोडं आश्चर्यच वाटलं, कारण तंबाखूच्या उत्पादनात भारत जगातील तिसरा देश असून ग्राहक या नात्याने चौथा ठरतो. दहा लाखांहून अधिक शेतमजूर, चाळीस लाखांहून अधिक विडी कामगार आणि १००० कोटी रुपयांची बाजारपेठ अशी मायानगरी तंबाखूने उभारलेली आहे. आज देशात जवळपास सत्तर टक्के लोक तंबाखूचे सेवन करतात आणि त्यात स्त्रियांचाही समावेश आहे. परंतु एवढे असून देखील हा तंबाखू मूळचा कुठला याबाबत तंबाखू सेवन करणाऱ्यांना कचितच माहिती असेल.

तंबाखू ही मूळची अमेरिका खंडातील वनस्पती. कोलंबस व त्याच्या खलाश्यांनी १४९२ च्या सुमारास वेस्ट इंडीज बेटात स्थानिक लोकांना तंबाखूचा वापर करताना पाहिले. त्या अगोदर कित्येक वर्षे अमेरिकेतील रेड इंडियन लोक तिचा औषधासाठी व समारंभात उपयोग करीत. काहींच्या मते बाराव्या शतकात आशियात तंबाखूची वनस्पती अस्तित्वात होती. भारतातील पौराणिक कथांतील तंबाखूसंबंधी पुष्कळशा उल्लेखांवरून व आयुर्वेदीक पद्धतीने तयार करावयाच्या काही औषधांच्या कृतींवरून या देशात ही वनस्पती फार प्राचीन काळापासून माहीत होती असे दिसते. तंबाखू ज्या वनस्पतीपासून मिळवितात ती आणि तिच्या इतर जाती मूळच्या उत्तर आणि दक्षिण अमेरिकेतील असून काही ऑस्ट्रेलियातील आहेत. त्या सर्व निकोटियाना या शास्त्रीय नावाने ओळखल्या जाणाऱ्या फुलझाडांच्या वंशातील व धोत्रा कुलातील असून निकोटियाना टॅबॅकम (देशी) आणि नि. रस्टिका (विलायती) या जाती तंबाखूकरीता लागवडीत आहेत. हे नाव 'झां नीको' (१५३०-१६००) हा फ्रान्सच्या लिस्बन (पोर्तुगाल) येथील राजदूताच्या नावावरून दिले आहे, कारण त्यांनी बेल्जियम मधील एका व्यापाऱ्याकडून तंबाखू घेऊन ती प्रथम पोर्तुगालच्या राजदरबारी सादर केली व नंतर फ्रान्सला परत आल्यावर राणीला (कॅथ्रिअन द. मेदेसेस) भेट म्हणून दिली. कोलंबस यांच्या पूर्व काळात वेस्ट इंडिज, मेक्सिको, म. अमेरिका व द. अमेरिकेच्या उत्तर भागात तंबाखू लागवडीत होता. कोलंबस यांचे खलाशी प्रथम वेस्ट इंडीजमध्ये उतरले त्या वेळी तेथील कॅरीब इंडियन लोकांना तंबाखूच्या पानांचे सिगार ओढताना आणि तंबाखूच्या पानांना विस्तवावर टाकून नाकाने वाय या इंग्रजी आकाराच्या नळीच्या साहाय्याने धूर ओढताना पाहिले. त्या नळीला किंवा सिगारला 'टोबॅकस' हे नाव होते व पुढे तेच नाव तंबाखूला दिले गेले.

एक नगदी पीक या नात्याने सेवनासाठी तंबाखूची ओळख हिंदुस्थानला करून दिली ती पोर्तुगीजांनी. सोळाव्या शतकात दक्षिणेत विजापूर व गोवळकोंडा या सुलतानशाह्यांनी तंबाखूचे प्रथम स्वागत केले. ही दोन्ही राज्ये पुढे दर्जेदार तंबाखूसाठी ओळखली जाऊ लागली. उत्तर हिंदुस्थानात तंबाखूचा प्रवेश अकबराच्या कारकीर्दीत झाला. आग्र्याच्या लाल किल्ल्यात सप्टेंबर १६०४ मध्ये असद बेगने बादशहासमोर सर्वप्रथम हुक्का सादर केला.

तंबाखू तशी अकबरास नवी नव्हती. त्यापूर्वी एका हकीमाने मक्केहून आणलेली तंबाखू भेट म्हणनू दिली होती, पण त्याकडे अकबराने दुर्लक्ष केले. यावेळी मात्र अकबर झुरके घेण्यास तयार झाला तेव्हा शाही हकीम अली याने त्यास हरकत घेतली. पण त्याची पर्वा न करता बादशहाने करायचे ते केले. ते पाहून दुसऱ्या एका हकीमानेसुद्धा विरोध नोंदविण्याचे धाडस केले. अकबर तसा चिकित्सक बुद्धिचा माणूस. यापूर्वी तंबाखू आणून देणारा इसमसुद्धा हकीमच होता; म्हणून त्याला बोलावून या प्रश्नाची उघड चर्चा अकबराने घडवून आणली. अशा रीतीने भारतीय इतिहासातील तंबाखूवरचा पहिला वाद रंगला. हकीम अली या वादात मागे राहिला व असद बेगने युक्तीवादाने आपली बाजू मांडून चर्चासत्र जिंकले. तंबाखू पक्ष जिंकल्यामुळे धुम्रपानास बादशहाची परवानगी मिळाली.

१७ ऑक्टोबर १६०५ मध्ये अकबराचा मृत्यू झाला. त्यानंतर गादीवर आलेल्या जहांगीरने धूम्रपानास संपूर्ण बंदी घातली. चोरून धूम्रपान करणाऱ्यांचे ओठ कापण्यापर्यंत त्याने तंबाखूच्या सेवनावर बंदीबाबत सक्ती केली. परंतु शाहजहानच्या काळात तंबाखू ही सरकारी उत्पनाचे महत्त्वाचे साधन होऊन बसली व तिची निर्यातही होऊ लागली. अठराव्या शतकात तंबाखू सेवनाचा प्रसार खूपच झाला. खेड्यापाड्यातून सामुदायिक हुक्कापाण्याला संस्थात्मक स्वरुप प्राप्त झाले. मुंबईत १६ व १७ व्या शतकात तंबाखूची लागवड होत होती. १९ व्या शतकात प्रतिष्ठितांना तपकिरीचे व्यसन लागले. ब्राझीलचा तंबाखू गोव्यात येई. तेथे त्याची 'पूड' करण्यात येत असे. तपकिरीचा धंदा करणाऱ्यास पुडकर म्हणत. १८८३ साली मुंबईत तंबाखूच्या ३५० गाद्या होत्या. मिरजचा तंबाखू उत्कृष्ट मानला जाई. मुंबईत सिगरेट मात्र १९०७ साली दाखल झाली. कॉरनेशन सिगार कंपनीने ती प्रथम आणली. आज भारतात तंबाखूचे व्यापारी महत्त्व मोठे आहे. भारतातील तंबाखूचे व्यापारी आणि लागवडी खालील प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत. -

| व्यापारी प्रकार | लागवडीचे प्रमुख प्रदेश | लागवडीखालील प्रमुख प्रकार |
|---|---|---|
| १) सिगारेटची तंबाखू नि. टाबॅकम | आंध्रप्रदेश, कर्नाटक | हॅरिसन स्पेशल, हिक्स, हॅरिसन स्पेशल - ९, चॅथम, डेल्क्रेस्ट, व्हाइट बर्ले व दर्शिता. |
| २) नदू अथवा देशी प्रकार | | |
| i) नि. टाबॅकम | आंध्रप्रदेश, गुजरात | केसरिनू-२० आणि-१९, गोटिपू -६, [illegible]-१२, चिलिपू - १८ व [illegible] - ४१. |
| ii) नि. रस्टिका | कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात | सुरती-२०, चिरीव, निपाणी, [illegible] आणि [illegible], पढरपुरी कलकत्तिया. |
| ३) सिगार व चिरूटाची तंबाखू | | |
| नि. टाबॅकम | आंध्रप्रदेश, तमिळनाडू, प. बंगाल. | [illegible], [illegible]-२३, नदू, [illegible], [illegible], [illegible], [illegible], [illegible], [illegible], [illegible], [illegible], [illegible] व [illegible] सुमात्रा. |
| शेड | | |
| ४) हुक्का तंबाखू | | |
| i) नि. टाबॅकम | पंजाब | मोती, काका, धोरा, पिठी, टी-२३ आणि टी-२३ |
| | बिहार | देशी प्रकार |
| | उ. प्रदेश | देशी प्रकार |
| | प. बंगाल, आसाम | जाती प्रकार (पाना, धोरा) |
| ii) नि. रस्टिका | पंजाब | गोभी, टी -२१८, टी-२३८, ए. पी. एस. -२१९. |
| | उ. प्रदेश | कलकत्तिया |
| | बिहार | बिलायती |
| | प. बंगाल | मोतीहारी |
| ५) खाण्याची व तपकिरीची तंबाखू | | |
| i) नि. टाबॅकम | उ. प्रदेश, बिहार आसाम तामिळनाडू | देशी ([illegible], [illegible], [illegible]) आणि एन. पी.-७० [illegible], [illegible] आणि [illegible]. |
| ii) नि. रस्टिका | पंजाब | मोतीहारी |
| | आसाम, बिहार | बिलायती |
| | पंजाब | कलकत्तिया |

**उपयोग :** भारतात उत्पादन होणाऱ्या तंबाखूचा पुष्कळसा भाग सिगारेट, विडी, सिगार, चिरुट, चुट्टा, हुक्का, चिलीम, पाईप यांच्याद्वारे धूम्रपानासाठी वापरला जातो. तसेच तंबाखू विविध स्वरुपात दात घासण्यासाठी वापरतात. तंबाखूचा उपयोग एके काळी औषधांमध्ये शामक, आकडीरोधक, कृमिनाशक म्हणून पचनाच्या तक्रारी आणि त्वचा रोग यांवर केला जात असे. तंबाखूच्या उत्पादनातील टाकाऊ मालापासून (खोड, शिरा आणि पानांचा भुगा) निकोटीन काढण्यात येते आणि निकोटीन सल्फेटच्या रुपात कृषिउत्पादनात ते कीटकनाशक म्हणून मोठ्या प्रमाणावर वापरण्यात येते. निकोटीन काढून घेतल्यावर राहिलेल्या मालाचा खतासाठी वापर करण्यात येतो. यामध्ये पोटॅशचे प्रमाण पुष्कळ असते. तंबाखूचे बी जनावरांसाठी खाद्य म्हणून वापरण्यात येते. बियांपासून तेलही काढण्यात येते व ते शुद्ध करून खाण्यासाठी आणि रंग व व्हर्निश यांमध्ये वापरण्यात येते. पेंडीमध्ये प्रथिन पुष्कळ प्रमाणात असते त्यामुळे शेतजनावरांसाठी ती उपयुक्त खाद्य आहे. परंतु जगामध्ये सर्वत्र तंबाखूचा वापर सर्वांत जास्त प्रमाणात सिगारेटच्या स्वरुपात होतो. ज्यामुळे कर्करोगासारखे अनेक भयंकर आजार होतात.

अशी तंबाखूची कहाणी आहे. पण तंबाखू सेवनाचे अनेक दुष्परिणाम आहेत. म्हणून आपण हे नेहमी लक्षात ठेवलं पाहिजे, '' तंबाखू खाणे हे आरोग्यास हानिकारकच आहे !!!''

गीतेश गजानन शिंदे
२०३, स्वप्नजा सोसायटी,
धोबी आळी, मावळी, मंडळ हॉल जवळ,
टेंभी नाका, ठाणे (प) ४०० ६०१.
दूरध्वनी : ५३७ ९५ ११

# बुद्धीदेवता

पृथ्वी तलावावरचा सर्वात बुद्धीमान प्राणी कोणता असे विचारल्यास 'माणूस' असे उत्तर आपण देतो. पण हे उत्तर हत्ती हे असायला हवे.

या महिन्यात ज्या गणेश चतुर्थीचा सण आपण साजरा करतो त्या गणेशाला बुद्धीची देवता म्हणून आपण पूजतो. गणपतीचा बुद्धीशी असणारा हा संबंध विचार करण्यासारखा आहे. गणपती बुद्धीचे दैवत कारण.... त्याला हत्तीचे डोके आहे. हत्ती किती हुशार प्राणी आहे याचा प्रत्यय घ्यायचा असेल तर सिंथिया मॉस या लेखिकेने लिहिलेले हत्तींच्या आठवणीचे पुस्तक वाचायला हवे. या पुस्तकाचे शीर्षक आहे. **Elephent Memoirs.**

- झरोका

# प्रकल्पांची यादी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ या विद्यापीठाचा ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाचा पदवी अभ्यासक्रम गेली तीन वर्षे विद्या प्रसारक मंडळातर्फे बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात चालविला जातो.

या अभ्यास क्रमाचा एक भाग म्हणून संदर्भ साधन बनविण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना यावा यासाठी एक १०० गुणांचा प्रकल्प विद्यार्थ्यांना करावा लागतो. गेल्या तीन वर्षात असे सुमारे शंभराच्या घरात प्रकल्प बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

हे प्रकल्प कोणते याची माहिती जाहीररित्या उपलब्ध झाली तर वाचकांना या संकलित माहितीचा उपयोग होऊ शकेल. या दृष्टीने आम्ही दिशाच्या वाचकांसाठी या प्रकल्पाची यादी येथे उपलब्ध करून देत आहोत.

सदर यादी बनविण्यासाठी केंद्रप्रमुख प्राचार्य सी. डी. पाटील व केंद्र संयोजक प्रा. मोहन पाठक यांचे मार्गदर्शन मिळाले आहे. ही यादी बनविण्याचे काम या केंद्राच्या माजी विद्यार्थीनी सौ. अलका चव्हाण व तृप्ती वेदक यांनी केले आहे.

**१९९९-२००० सूची प्रकल्प :**

१) शिक्षण समीक्षा : लेखसूची
 एप्रिल -जुलै १९९४
 फेब्रु - मार्च १९९७
२) अभिजात दिवाळी अंक लेखसूची (१९८३-८४)
३) साप्ताहिक सकाळ मधील लेखसूची
४) शतायुषी दिवाळी अंक लेखसूची (१९९५-९९)
५) दैनिक सन्मित्र लेखसूची (जुलै ते सप्टेंबर ९९)
६) Economic Development (1998-99) In India
७) ललित मासिकातील लेखांची सूची (१९८०-८५)
८) विज्ञानयुग लेखसूची (१९८६)
९) ललित (मासिक) १९७२ ते १९७९ लेखसूची
१०) अर्थमंथन साप्ताहीकातील लेखसूची
११) ललित (मासिक) दिवाळी अंकाची सूची (१९८८-१९९७ दहा वर्षातील)
१२) कानाचे रोग व त्यावरील शस्त्रक्रिया यावरील ग्रंथांची सूची
१३) 'ग्रामीण विकास' यावरील ग्रंथाची सूची
१४) दलित चरित्र - आत्मचरित्रांची सूची
१५) अभिजात दिवाळी अंकातील लेखसूची १९९४-९७
१६) सन्मित्र दैनिक लेखसूची प्रकल्प (ऑक्टो. ते डिसें १९९९)
१७) मराठी विश्वकोशातील शास्त्रज्ञांची सूची
१८) अभिजात १९९१ ते १९९३ सूची प्रकल्प.
१९) सन्मित्र दैनिकातील लेखसूची (जाने ते मार्च १९९९)
२०) अर्थवृत्तांत (अर्थमंथन साप्ता. लेखसूची ऑगस्ट ते ऑक्टो.१९९९
२१) विज्ञानयुग १९८० ते १९८४ सूची प्रकल्प.
२२) 'अरुणा ढेरे' यांच्या कवितांची चरणसूची
२३) 'अक्षर' दिवाळी अंकाची सूची (१९९५ ते १९९९)
२४) अनिल शाळिग्राम लेखांची सूची (२०००)

**२०००-२००१ सूची प्रकल्प :**

१) 'निसर्गायण' पुस्तकाची निर्देशसूची
२) जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांची सूची
३) सन्मित्र दैनिकातील लेखांची सूची
४) अर्थमंथन या नियतकातील लेखांची सूची
५) श्री. व शं. खानवेलकर यांच्या कवितेच्या चरणांची सूची
६) महाराष्ट्र शासनाच्या शालेय मराठीच्या पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या उतारे व कविता यांच्या मूळ ग्रंथांची सूची.
७) प्रा. दामोदर मोरे यांच्या साहित्याची समग्र सूची
८) प्रा. प्रवीण दवणे यांच्या बालकवितांची चरणसूची
९) लायब्ररी ऑटोमेशन या विषयावरील ग्रंथाची सूची.
१०) विज्ञानयुग सूची प्रकल्प
११) भारतीय ललित कला चित्र व शिल्प कलाकाराची ग्रंथाची निवडक सूची.
१२) श्री. निरंजन उजगरे रूपांतरित साहित्याची सूची.
१३) संगणकीय ग्रंथाची सूची २०००-२०००)
१४) दुर्मिळ नाटकांची सूची (१८५९-१९००)
१५) लोकसत्ता 'चतुरंग' लेखांची सूची
१६) मराठी विश्वकोशातील मुख्य व ऐतिहासिक ग्रंथाची सूची.
१७) सकाळ रविवार पुरवणी 'प्रतिमा' लेखसूची
१८) स्त्रीवादी साहित्य (२००१-२००२) सूची
१९) मोगल कालीन राजवटीतील ठाणे शहरातील विविध ग्रंथालयातील ग्रंथाची सूची.
२०) त्रिदल दिवाळी अंकाची सूची (१९९०-९४)
२१) शंकर पाटील यांच्या कथांची सूची
२२) विज्ञानयुग दिवाळी अंकातील विज्ञान कथांची सूची (१९९१-९९)
२३) शैक्षणिक मानसशास्त्र विषयाच्या पुस्तकांची सूची
२४) १९८५-२००० मधील ग्रंथाली प्रकाशनाच्या पुस्तकांची सूची
२५) निवडक व्यक्तिचित्रणांची मराठी ग्रंथसूची १९७५-२०००
२६) श्री. अरविंद दोडे यांच्या उपलब्ध असलेल्या लेखांची सूची
२७) ठाणे मराठी ग्रंथ संग्रहालयातील दुर्मिळ वैद्यकशास्त्र विषयावरील पुस्तकांची सूची (१८००-१९५४)
२८) फार्मा टाईम्स या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या लेखांची सूची (१९९५-२०००)
२९) नवशक्ती दैनिकाच्या रविवार पुरवणीतील लेखांची सूची
३०) 'बा. भ. बोरकर' यांच्या कवितांच्या पहिल्या ओळींची चरण सूची.

**२००१-२००२ सूची प्रकल्प :**

१) डॉ. र. म. शेजवलकर यांच्या समग्र साहित्याची सूची.
२) इंग्रजी माध्यमातील शाळेच्या मराठी द्वितीय भाषेच्या पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाचा उतारे व कविता.
३) मुंबई विद्यापीठ आणि तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांची मान्यताप्राप्त अभियांत्रिकी महाविद्यालय तंत्रज्ञान संस्था आणि तंत्रनिकेतन यांचा सूची प्रकल्प.
४) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रमातील पुस्तकात आलेल्या पारिभाषिक शब्दांची सूची
५) 'मुंबईचा वृत्तांत' पुस्तकांतील व्यक्तिनामांची सूची.
६) 'वाणिज्य' विषयातील लेखकांची सूची
७) 'डॉ. नेताजी पाटील' यांच्या समग्र साहित्याची सूची
८) २१ व्या शतकातील नवीन उपचार पद्धती - एक सूची
९) भगवत्गीतेतील तत्त्वज्ञानविषयक संकल्पनांची सूची
१०) 'एक होता कार्व्हर' - सूची
११) जाहिरात संस्थांच्या नावांची सूची

१२) श्री. म. पां. भावे यांच्या कवितांची चरणसूची
१३) विनायक आदिनाथ बुवा यांच्या समग्र साहित्याची सूची
१४) १९९६ ते २००० अक्षर दिवाळी अंकाची सूची
१५) आधुनिक शहरांची पौराणिक नावे - सूची
१६) महात्मा गांधी यांच्या चरित्रासंदर्भातील शब्दांची सूची
१७) ग्रंथपालांची सूची
१८) डॉ. शुभा चिटणीस यांच्या लेखांची सूची
१९) मुलुंड नागरिक वर्तमानपत्रातील लेखांची सूची
२०) बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील संदर्भ ग्रंथाची सूची
२१) मराठी विश्वकोशातील मराठी साहित्याकांची सूची
२२) बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालयात उपलब्ध प्रकल्पांची सूची.
२३) ठाणे जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांची सूची
२४) ठाणे शहरातील संस्थांची सूची
२५) अरविंद गोखले यांच्या लघुकथांची सूची
२६) 'वसंत आबाजी डहाके' यांच्या कवितेतील प्रथम चरणांची सची.
२७) ठाणे मराठी ग्रंथ संग्रहालयाची सांस्कृतिक कार्यक्रमांची सूची.
२८) इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांच्या अवांतर वाचनाच्या पुस्तकांची सूची.
२९) संगणक विषयावरील मराठी ग्रंथ - सूची
३०) B.A. च्या इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट झालेल्या पुस्तकांची सूची.
३१) प्रा. आयु. शुक्राचार्य गायकवाड यांच्या कवितांची चरणसूची
३२) 'डॉ. आयडा स्कडर' या पुस्तकाची व्यक्तीनाम आणि स्थलनाम निर्देश सूची.
३३) 'ठाणेजीवन' सूची
३४) ठाणे परिसरातील स्त्रीरोग तज्ज्ञांची सूची.

**१९९९-२००० कात्रण प्रकल्प :**

१) लोकसत्ता दैनिकातील अग्रलेख
२) पुस्तक परीक्षणांची कात्रणे (आक्टो ते डिसें १९९९)
३) आरोग्यविषयक कात्रणे
४) 'बोफोर्स' कात्रण प्रकल्प (आक्टो. ९९ ते जाने २०००)
५) भारतीय स्त्रियांचा राजकीय दर्जा
६) पुस्तक परीक्षणे लोकसत्ता व लोकरंगी
७) कारगिलनामा
८) कारगिलची शौर्यकथा (१९९९)
९) ऑलिम्पिक (२०००)

**२००१-२००२ कात्रण प्रकल्प :**

१) काश्मीर समस्या
२) प्लॅस्टिक कॅरीबॅगवरील बंदी
३) आरोग्य विषयक लेख व सदर
४) The times of India मधील 'QA' या सदराची कात्रणे (१ जुलै २००० ते २० नोव्हें २०००)

**२००१-२००२ कात्रण प्रकल्प :**

१) आरोग्य विषयक नवीन संकल्पना
२) लोकसत्ता वर्तमानपत्रातील पुस्तक परीक्षणांची कात्रणे
३) बाजारपेठेत नव्याने निर्माण झालेल्या उत्पादनांचा कात्रण संग्रह.
४) ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेल्या हल्ल्याचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम.
५) अमेरिकेवरील दहशतवादी हल्ल्यावरील कात्रण प्रकल्प.

❐❐❐

# परिसर वार्ता

ठाणे शहरातील विद्या प्रसारक मंडळाच्या महाविद्यालय परिसरातील निसर्ग समृद्ध वातावरण ही ठाण्याची अभिमान वाटावी अशी बाब आहे. १९७३ च्या पावसाळ्यात याच महाविद्यालयात असताना प्राचार्य नाडकर्णी सरांच्या प्रेरणेने केलेले वृक्षारोपण आज नारळाच्या झाडांच्या व बांबूच्या वनाच्या रुपाने रोज त्या दिवसांच्या आठवणी जागवत रहाते. त्यानंतर फ्लेमिंगो निसर्ग मंडळ' १९८४ ते १९९४ या कालावधीत आम्ही सक्रिय ठेवले. प्रा. मोझेस कोलेट, संजय जोशी, मी या सहकारी मित्रांनी व विद्यार्थ्यांनी जवळ जवळ प्रत्येक वर्षी झाडे लावली. त्याचे दृश्य रुप म्हणजे महाविद्यालय इमारतींमागील झाडांची दाटी. विज्ञान महाविद्यालया लगतचा रोज आशिर्वाद देणारा गुलमोहोर, मागच्या बाजूचे अॅकशिया, चिंच .....किती तरी झाडं. झाडाच्या प्रत्येक पानात एकेक आठवण दडलेली असावी असं हे स्वप्न. पक्षी, कीटक यांचा वैविध्य पूर्ण वावर पाहताना तो अभ्यासताना मन कस भरून येतं. आणि मुंबईच्या रुक्ष जगात कोठेतरी बोरिवलीचं नॅशनलपार्क असावं तसं ठाण्याच्या रोगट पसाऱ्यात काही हिरवं आहे. हे जाणवतं.

आज हे सगळं लिहायचं कारण म्हणजे एक ऑगस्ट हा विद्याप्रसारक मंडळाचा वर्धापन दिन. गेली काही वर्षे विद्याप्रसारक मंडळाने हा हिरवा परिसर अधिक नियोजन बद्ध करण्याचा निश्चय केला. झाडांवर नितांत प्रेम करणारी आम्ही माणसं झाडांच्याच सहवासात ज्ञान वृक्षात रुपांतर झालेल्या डॉक्टर वा. ना. बेडेकरांच्या या हिरव्या स्वप्नाने भारावतो. डॉ. ही आमची प्रेरणा. विद्यार्थी असतानापासून गेली तीस वर्षे डॉक्टरांचे हे वृक्षप्रेम वाढत गेलेले आम्ही पाहत आहोत. त्याच प्रमाणे स्वतः मातीत हात घालून झाडे लावलेले उपाध्यक्ष करंदीकर आणि अशा या हिरव्या परिसरातच संपूर्ण परिसराच्या कडेला हिरवा ज्ञान मार्ग उभा करण्याचे स्वप्न पहाणारे डॉ. विजय बेडेकर, विद्याप्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री. उत्तमराव जोशी, श्री. मा. व. गोखले आणि सर्व कार्यकर्त्यांच्या तळमळीने यंदाही एक ऑगस्टला हा ६७ वा वर्धापन दिन वृक्षारोपण दिन म्हणून साजरा करण्यात आला.



ज्ञानमार्गाचे उद्घाटन करताना डॉ. वा. ना. बेडेकर

या प्रसंगी ज्ञानमार्गाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन माननीय डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्यान विद्या शास्त्राच्या दृष्टीने तयार करण्यात आलेले भाज्यांचे वाटे, रोपवाटिका व विशेष म्हणजे स्वयंचलित रहाट, रस्त्याच्या दुतर्फा असणारी सुंदर झाडे व हिरवळ हे सर्व अतिशय मेहनतीने उभे करण्यात आले आहे. श्री. वागकर, श्री. चंदु भाई, श्री. कुमार यांनी त्यासाठी घेतलेल्या मेहनतीचा कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी आवर्जून उल्लेख केला. त्यावेळी उपस्थित असणाऱ्या विद्यार्थी, प्राध्यापकांना हा सर्व प्रकल्प दाखविण्यात आला.

विद्याप्रसारक मंडळाचे पदाधिकारी, संस्थाचे प्रमुख व उपप्राचार्य यांच्या हस्ते तसेच पर्यावरण प्रेमी प्राध्यापकांच्या हस्ते यावेळी वृक्षारोपण करण्यात आले. ग्रीनफोर्स नेचर क्लबचे पारिया सर व रोठोड विद्यार्थ्यांसह या वृक्षारोपणात सहभागी झाले होते.

या निसर्गबागेत निरनिराळ्या शंभर प्रकारची झाडे लावण्यात आली आहेत. फळझाडे, फुलझाडे, दैनंदिन उपयोगाच्या भाज्या, औषधी वनस्पती, विविध मसाल्याची रोपे आणि वेली यांचा त्यात समावेश आहे. प्रायोगिक तत्त्वावर 'जैविक शेतीचे' १५ वाफे तयार करण्यात आले. असून रासायनिक खते न वापरता केवळ शेणखताचा वापर करून फुलवलेल्या या शेतामध्ये काकडी, गवार, शिराळी, दुधी भोपळा, भेंडी, कारली, तोंडली, वावडिंग, वेलदोडे, कापूर, चिंच, गुळवेल, लवंग, मिरी, शतावरी, मुरुडशेंग, कोकम, रक्तचंदन, काळाधोत्रा आदींची लागवड करण्यात आली आहे. सेंद्रिय खताचा प्रकल्पही येथे सुरु करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना भिंतीबाहेर असलेल्या शिक्षणाची अनुभूती मिळावी, या उद्देशाने हा निसर्ग उद्यानाचा प्रकल्प राबविण्यात येत असल्याचे डॉ. विजय बेडेकर यांनी सांगितले.

या दिवशी रात्री झालेल्या छोटेखानी समारंभात विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. बेडेकर यांनी शिक्षण क्षेत्रातील भविष्यकालीन बदल व त्या अनुषंगाने संस्था म्हणून आपल्याला काय करावे लागेल याबद्दल केलेले अतिशय विचारपरिप्लुत व्याख्यान फार महत्त्वाचे होते. शिक्षण क्षेत्रातील लोकांना अंतर्मुख करणारे असे हे मुलभूत विचारमंथन होते. सदर कार्यक्रम काही निमंत्रितांसाठीच मर्यादित होते. यात प्राचार्य सी. जी. पाटील, प्रा. लाड, प्रा. मोहन पाठक आदींनी आपले मनोगत मांडताना मंडळास शुभेच्छा दिल्या.

## नॅक-कार्यशाळा

दि. ५ ऑगस्ट रोजी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने थोरले बाजीराव पेशवे सभागृहात 'नॅक' संबंधी एक दिवसाची कार्यशाळा आयोजित केली होती.

या कार्यशाळेत नॅकसाठी आवश्यक असणाऱ्या निकषांच्या दृष्टीने डॉ. आर. एस. हांडे, प्रा. सौ. के. एन् उचिल, डॉ. सौ उषा मुकुंदन आदी नॅकचा दर्जा मिळालेल्या अन्य महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य सी. जी. पाटील, नॅक स्टिअरिंग कमिटीचे निमंत्रक प्रा. आर. एस. पोद्दार, उपप्राचार्या डॉ. सौ. पेजावर, प्रा. स. ग. मेहेंदळे यांच्यासह अनेकांनी सदर कार्यशाळेसाठी विशेष कष्ट घेतले. प्रा. सौ. मीरा अकोलकर या स्वागत समितीच्या प्रमुख होत्या.

## बांदोडकरच्या माजी विद्यार्थ्यांची सभा

येथील बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाची प्राथमिक सभा महाविद्यालयात शनिवारी सायंकाळी घेण्यात आली. विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सुमारे शंभर विद्यार्थ्यांची सभेस उपस्थिती होती.

सभेच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे ग्रंथपाल व माजी विद्यार्थी संघाचे संघटक प्रा. मोहन पाठक यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील यांनी गेल्या पस्तीस वर्षात महाविद्यालयाची झालेली जडणघडण विशद करून माजी विद्यार्थी संघाची आवश्यकता स्पष्ट केली. पदवी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी बांदोडकर महाविद्यालयांसाठी, विद्यार्थ्यांसाठी माजी विद्यार्थी कसे साहाय्य करू शकतात याबद्दल मार्गदर्शन करून नोव्हेंबर मध्ये होणारी राष्ट्रीय परिषद यांची माहिती दिली. प्रा. मोहन पाठक यांनी माजी विद्यार्थी संघाचे उपक्रम काय असू शकतील याबद्दल आपली मते स्पष्ट केली. उपप्राचार्य प्रा. मकरंद दिक्षित यांनी कनिष्ठ महाविद्यालयातून बाहेर पडलेले अनेक विद्यार्थी वैदकीय व अभियांत्रिकी क्षेत्रात कसे आघाडीवर आहेत हे सांगितले.

यानंतर श्री. राजन गुप्ते, डॉ. आर. पी. आठल्ये, डॉ. संजय देशमुख, प्रा. मकरंद वैद्य, प्रा. प्रवीण गुरव आदी माजी विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त करून सूचना

केल्या. डॉ. नंदिनी पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. माजी विद्यार्थी संघाची पुढील बैठक २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता होईल अशी माहिती यावेळी देण्यात आली.

### ग्रीन फोर्स निसर्ग मंडळ

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या 'ग्रीन फोर्स' निसर्ग मंडळाने ११ ते १५ ऑगस्ट निसर्ग सप्ताह साजरा केला. या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील व उपप्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांच्या मार्गदर्शनाखाली चौदा व पंधरा ऑगस्ट रोजी एक निसर्ग प्रदर्शन जिमखान्यात भरविण्यात आले. विद्यार्थी व शिक्षकांबरोबरच विद्याप्रसारक मंडळाचे पदाधिकारी, तसेच परिसरातील महाविद्यालय यांनी प्राध्यापकांनी प्रदर्शनास भेट दिली. यात वन विभागाच्या साहाय्याने उपलब्ध झालेली भींती पत्रके, विज्ञान महाविद्यालयातील महत्त्वपूर्ण निसर्ग विषयक ग्रंथ यांचीही मांडणी करण्यात आली होती. प्रा. किरण परिआ, प्रा. सुदेश राठोड यांच्यासह प्राणिशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापकांनी प्रदर्शनाकरिता विशेष कष्ट घेतले होते. या सप्ताहा निमित्ताने प्रा. विद्याधर वालावलकर प्रा. संजय जोशी, डॉ. गिरीजा कुलकर्णी या निमंत्रितांची निसर्ग व पर्यावरण संदर्भात भाषणे आयोजित करण्यात आली होती. तसेच येऊर येथे निसर्ग सहल नेण्यात आली होती.

### बेडेकर विद्यामंदिरात राखी प्रदर्शन

डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या माध्यमिक विभागातर्फे शाळेत दि. १४ ऑगस्टपासून राख्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. वि. करंदीकर यांच्या हस्ते फित कापून व दीप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर, उपमुख्याध्यापिका सौ. ज्योत्स्ना चौबळ, पर्यवेक्षक प्र. वा. कुलकर्णी, शिक्षिका सौ. उज्ज्वल. ताम्हणे, उज्ज्वला धोत्रे, शिक्षक प्रकाश पांचाळ, शाळेचे माजी शिक्षक प्र. ग. वैद्य आणि विद्यार्थी उपस्थित होते.

राख्या तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांची व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांची श्री. करंदीकर यांनी स्तुती केली. आपल्या. मनोगतात ते म्हणाले की, " आपणास पुढे कोण व्हायचे आहे, काय करावयाचे आहे हे मुलांनी आत्ताच ठरविले पाहिजे. अनेक कलांचे, अनेक व्यवसायांचेही शिक्षण घेतले पाहिजे."

काही विद्यार्थी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, बाईंनी आम्हाला राख्या तयार करावयास शिकविले. आम्हांला निर्मितीचा आनंद मिळाला. राख्या तयार करण्याचा जर आम्ही पुढे व्यवसाय सुरु केला तर आमचा चरितार्थ आम्ही नक्कीच चालवू शकू. आम्ही त्या कलेमुळे आमच्या पायावर उभे राहू शकू.

राखी पौर्णिमेनिमित्त भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनात इ. ६ वी व ७ वीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या ठेवण्यात आल्या होत्या. हजारोंनी तयार केलेल्या या रंगीबेरंगी राख्यांचे प्रदर्शन अतिशय प्रेक्षणीय झाले असून या राख्या तयार करण्यासाठी विविध आकाराची फुले, पाने, मणी, स्पंज, लोकर, लेस, दोरे व इतर अनेक प्रकारचे साहित्य वापरण्यात आले आहे. सुमारे दोन ते अडीच हजार राख्या तयार करण्यास हस्तकला शिक्षिका सौ. कल्पना बोरवणकर यांनी मार्गदर्शन केले. शिक्षिका उज्ज्वला धोत्रे, सौ. उज्ज्वल ताम्हणे तसेच शिक्षक प्रकाश पांचाळ यांनीही मदत केली. मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर यांनी त्यांना प्रोत्साहन दिले.

डॉ. बेडेकर विद्यामंदिरच्या हस्तकला विभागातर्फे गेली चार वर्षे हा उपक्रम सातत्याने चालू आहे. विद्यार्थ्यांनी

तयार केलेल्या ह्या राख्या बाजारातील राख्यांच्या दर्जाच्या असून अतिशय सुंदर व कलापूर्ण होत्या.

**स्वातंत्र्य दिन**

प्रतिवर्षाप्रमाणे स्वातंत्र्य दिनी विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व घटक संस्थांचे एकत्रित ध्वजवंदन १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता महाविद्यालय परिसरात माननीय डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते झाले. या वेळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांना त्यांनी शपथ दिली व या विद्यार्थ्यांच्या सलामीचा स्वीकार केला. या प्रसंगी बेडेकर विद्या मंदिरातील विद्यार्थ्यांना बनविलेल्या हस्तलिखितांचे व भित्ती पत्रिकांचे प्रकाशन करण्यात आले. आपल्या भाषणात डॉ. वा. ना. बेडेकर यांनी योगेश यांच्या विलक्षण धाडसाचे उल्लेख करून त्याचे विशेष अभिनंदन केले.

या प्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, घटक संस्थातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**लायनस्क कॉम्प्युटर कार्यवाहक प्रणालीचा शुभारंभ**

'विण्डोज' कॉम्प्युटरला पर्याय ठरू शकणारी लायनस्क ही संगणक प्रणाली सर्व भारतीय भाषांमध्ये आणि सर्वत्र पोहोचविण्याचे काम येत्या दोन ते तीन वर्षात होईल. त्यासाठी संशोधन सुरु असल्याचे प्रतिपादन कन्वल रेखी तंत्रज्ञान विद्यालयाचे प्रमुख डॉ. डी. बी. फाटक यांनी केले. महाविद्यालय परिसरात लायनस्क कॉम्प्युटर कार्यवाहक प्रणालीचा शुभारंभ डॉ. फाटक यांच्या हस्ते झाला त्यावेळी बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर अध्यक्षस्थानी होते.

संस्थेतील २० संगणक संच लायनस्क प्रणालीवर लोड झाले असून हळूहळू उर्वरित संगणकाची त्यात भर पडणार आहे.

विद्या प्रसारक मंडळाने देशाच्या दृष्टीने महत्वाचा असणारा प्रकल्प आपल्या संस्थेत सुरु केला त्याबद्दल श्री. फाटक यांनी आनंद व्यक्त केला.

भारतातील शैक्षणिक संस्थांना कमी खर्चात. लायनस्क प्रणालीचे सॉफ्टवेअर उपलब्ध करून देता येईल असा विश्वास डॉ. फाटक यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

अमेरिकेतील मायक्रोसॉफ्ट कंपनीच्या विण्डोज कॉम्प्युटर प्रणालीला लायनस्कची प्रणाली पर्यायी ठरणार असून त्याच्या वापरामुळे देशाचे परकीय चलन मोठ्या प्रमाणावर वाचणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्यामधील आज्ञा सुलभ करून त्यांचा विकास करण्यात आला आहे.

प्रारंभी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. बेडेकर यांनी प्रास्ताविक केले. संस्थेने क्रांतिकारक पाऊल टाकले असल्याचे नमूद करून बेडेकर यांनी सांगितले की, शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालये आणि उद्योग जगताने या कार्यप्रणालीचा अंगिकार करावा.

शेवटी डॉ. फाटक यांनी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे देऊन त्यांचे शंकानिरसन केले.

**बांदोडकर महाविद्यालय-वक्तृत्त्व व वादविवाद स्पर्धा**

दि. १६ ऑगस्ट रोजी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात वक्तृत्त्व व वादविवाद स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या समितीने स्पर्धेसाठी पुढील विषय दिले होते. वादविवाद-आंतरराष्ट्रीय दहशतवादात युद्ध हाच पर्याय आहे/नाही. वक्तृत्त्व १) क्रिकेट विरुद्ध फुटबॉल २) जैन तंत्रज्ञानाचा उपयोग ३) व्यवसायाच्या नव्या दिशा ४) दूरदर्शन मालिका व कौटुंबिक स्वस्थ ५) आचार - विचार व उच्चार यातील प्रदूषण.

स्पर्धेस विद्यार्थ्यांचा प्रतिसाद चांगला होता. काही हिंदी भाषिक विद्यार्थ्यांनी ही स्पर्धेत भाग घेतला होता. परीक्षक म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक, कनिष्ठ महाविद्यलयाच्या मराठीच्या प्रा. सौ. उषा बाळ, इंग्रजीच्या प्रा. सौ. लुईस व थॉमस यांनी काम पाहिले.

यावेळी प्राचार्य सी. जी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर प्रा. मोहन पाठक यांनी वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेतील विद्यार्थ्यांबाबतची निरीक्षणे नोंदली. स्पर्धेचे आयोजन समिती प्रमुख प्रा.डॉ. सौ. महाजन व त्यांच्या समितीतील सहकारी प्राध्यापकांनी केले होते.

**जोशी महविद्यालयात संदर्भ ग्रंथ प्रदर्शन**

जोशी बेडेकर महाविद्यालयातर्फे १९ आणि २० ऑगस्ट असे दोन दिवस आगळेवेगळे संदर्भ ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शन ग्रंथपाल व माहिती शास्त्र आभार क्रमाच्या विद्यार्थ्यांनी संयोजित केले होते.



प्रदर्शनाचे उद्घाटन करताना माननीय डॉ. वा. ना. बेडेकर. सोबत श्री. मा. य. गोखले, प्राचार्य सी.जी. पाटील, प्राचार्य स. वा. गोखले, प्रा. नारायण बारसे, प्राचार्य वि. गो. नंद व प्रा. मोहन पाठक.

या प्रदर्शनाचे उद्घाटन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बेडेकर यांनी संगणकाची कळ दाबून गणेश पूजन केले. महाविद्यालयाची विद्यार्थिनी मयूरा केतकर हिने शारदास्तवन सादर केले.

महाविद्यालयचे प्राचार्य स. वा. गोखले यांनी संदर्भ ग्रंथ प्रदर्शनाचे महत्त्व विषद केले. ते म्हणाले, दृकश्राव्य माध्यमामुळे आजचा विद्यार्थी ग्रंथापासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना ज्ञानाचे संदर्भ व स्रोत कळावेत, त्यांच्या ज्ञानाची खोली वाढावी तसेच ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या नेहमीच्या ग्रंथांव्यतिरिक्त विविध महत्त्वाच्या संदर्भ साहित्याची ओळख व माहिती व्हावी हा हे प्रदर्शन आयोजन करण्यामागचा प्रमुख हेतू आहे. निवडक, दर्जेदार व नावाजलेल्या संदर्भग्रंथाचे मुखपृष्ठ व त्या ग्रंथाविषयी माहिती आणि ग्रंथात असलेल्या माहिती आणि ग्रंथात असलेल्या माहितीचा गोषवारा असलेल्या पॉवर पॉईन्ट ऑनलाईन प्रेझेंटेशन हे या प्रदर्शनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

प्राचार्य गोखले पुढे म्हणाले की, महाविद्यालयाने या ग्रंथालयात आतापर्यंत १ कोटी रुपये खर्च केले असून ग्रंथालय अद्ययावत करतांनाच त्याच्या संपूर्ण संगणकीकरणावर भर देण्यात आला आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. बेडेकर यांनी महाविद्यालय राबवीत असलेल्या विविध उपक्रमांची प्रशंसा केली तसेच संदर्भ ग्रंथ प्रदर्शन आयोजकांचे कौतुक केले आणि अशा उपक्रमांना आमचे मार्गदर्शन सतत मिळेल अशी ग्वाही देऊन या उपक्रमांना आशिर्वाद दिले.

या प्रसंगाचे औचित्य साधून या उपक्रमावर आधारित एक सीडीचे डॉ. बेडेकर यांनी प्रकाशन केले, त्याचप्रमाणव संगणकाच्या सहाय्याने मोठ्या पडद्यावर पॉवर पॉईन्ट ऑनलाईन प्रेझेन्टेशनची सुरुवातही त्यांनी केली. प्रा. नारायण बारसे यांनी उपस्थितांचे स्वागत करून या प्रदर्शनाची तयारी आणि संकल्पनेविषयी माहिती दिली.



**सी. डी. चे प्रकाशन करताना डॉ. वा. ना. बेडेकर सोबत प्राचार्य स. वा. गोखले, प्राचार्य सी. जी. पाटील व प्रा. नारायण बारसे.**

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिल भावड यांनी तर आभार कु. उषा हिने मानले. मंडळाचे खजिनदार मा. य. गोखले, सदस्य दिलीप जोशी, प्राचार्य सी. जी. पाटील, मुंबई विद्यापीठाचे निवृत्त ग्रंथपाल आणि विभागप्रमुख डॉ. शरदचंद्र गणपुले, विद्यापीठातील प्रा. पाठक, डॉ. सौ. प्रतिभा गोखले, ग्रंथपाल मोहन पाठक, निवृत्त प्रा. श्री. कृष्णन्, प्राचार्य विनोद नंद, वास्तुविशारद श्री. पानसरे, आदि मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. विशेष म्हणजे इंग्लंडहून भारतात शैक्षणिक भेटीवर आलेल्या ज्युडी टील या ब्रिटीश महिला ग्रंथपालानी या प्रदर्शनास भेट दिली. प्रदर्शनास सर्व माध्यमांनी मोठी प्रसिद्धी दिली.

**आजचा अफगाणिस्तान**

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी व विद्या प्रसारक मंडळाच्या संयुक्त विद्यमाने २२ ते २५ ऑगस्ट या दरम्यान 'आजचा अफगाणिस्तान' या विषयावरील प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. दि. २२ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात सदर प्रदर्शनाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम ठाणे महानगर पालिकेचे उपमहापौर ॲड. सुभाष काळे


समारंभाचे प्रास्ताविक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी केले. उपमहापौरांनी आपल्या भाषणात इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात डॉ. विजय बेडेकर यांनी महत्त्वपूर्ण भर घातली असल्याचे नमूद केले. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे महासंचालक श्री. विनय सहस्रबुद्धे यांनी २९ एप्रिल ते ५ मे २००२ या दरम्यान झालेल्या या दौऱ्यातील काही निरीक्षणे नोंदली. डॉ. वा. ना. बेडेकर यांनी अध्यक्षीय भाषण केले. यानंतर अफगाणिस्तानच्या दौऱ्यावर आधारित अनुबोध पट दाखविण्यात आला.

सदर कार्यक्रमास मंडळाचे उपाध्यक्ष श्री. वि. करंदीकर, कोषाध्यक्ष श्री. माधवराव गोखले, श्री. दीलीप जोशी, कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य सदाशिवराव गोखले, आदी मान्यवर उपस्थित होते.

रविवार दि. २५ रोजी झालेल्या समारोपा प्रसंगी अफगाणिस्तानातील संस्कृतीबद्दल डॉ. विजय बेडेकर यांनी आपले विचार मांडले.

**प्रा. मोहन पाठक**

❑❑❑



# खरंच सांगतो, ती वाचन-उत्सुक गोड मुलं आहेत !

माझ्या प्रिय पालकांनो,
शिक्षक सहकाऱ्यांनो,
आणि पुस्तकवेड्या ग्रंथपालांनो,
आता शिकवा मुलांना महत्त्व पुस्तकांचं,
पुस्तकांच्या वाचनाचं.
जे जीवनाला आकार देतं
आणि बहुश्रुत करतं,
विचार करायला शिकवतं तेच खरं वाचन हे
ध्यानात आणून द्या त्यांच्या.
नुसतं पोथीनिष्ठ करू नका मुलांना
आणि करूनही घेऊ नका केवळ पोपटपंची !
होऊ द्या जाणीव त्यांना 'गावगाड्याची'
आणि 'गावगाड्याबाहेरच्या' आयुष्याची.
तेव्हा कांचळेचं जिणं त्यांना समजायला हवं,
तसंच 'उपरा' असणं म्हणजे काय असतं
ते ही कळायला हवं.
'वलुतं' दारांची वणवण पोचली पाहिजे त्यांच्या
खोल आतवर 'आठवणीतल्या पक्ष्यांसारखी'
आणि माणसं कळायला हवीत रस्त्यारस्त्यावरची.
'कोसवाडच्या टेकड्या' त्यांना चढायला शिकवा.
आणि शिकवा त्यांना की आदिवासी समजून
घेताना दमायला होत नसतं तर
त्यातून 'जेव्हा माणूस जागा होतो'
तेव्हा या जागा झालेल्या माणूसपणामुळेच
'माता नर्मदा' ही समजते आणि समजतं
'भारतीय स्त्रीजीवन' व दिसू लागतात
'स्त्री-संघर्षाची नवी रूपे.
या नव्या रूपातच त्यांना जेव्हा भेटेल एखाद्या
'अरुणाची गोष्ट.'
तेव्हा 'इच्छा नसताना' ही कसं वागायचं ते
आपसूक मनात उतरेल त्यांच्या.
उतरलं जाईल 'निरामय कामजीवन'
तेव्हा 'एड्सचे दुष्परिणाम' सांगायची
वेळच येणार नाही आपल्यावर.
'वैद्यकसत्तेतला' 'क्लोरोफॉर्म' त्यांना गुंगी आणेल
अथवा 'कॅन्सरची कहाणी' वाचून
'लाखमोलाचा जीव' कसा वाचवावा
म्हणून ते भयभीत होतील. पण त्यांना द्या समजावून की
संगीता बझेसारखी तरुणी
ही 'कॅन्सरची यात्रा' करून 'कॅन्सरची झुंज'
देऊन आली आहे.
'उंच माणसांच्या बेटांवरचे' हे केवळ अपघात
असतात,
हे ही सांगा त्यांना पुस्तकं दाखवून.
नेहमीच त्यांनी आपल्या 'अवतीभोवती'
बघायला शिकलं पाहिजे असं वाटत
असेल तर,
'जगावेगळं जग' पाहायला शिकवा त्यांना
'इदं न मम' चा मंत्रघोष आत्मसात
करायला सांगा.
'हमाल पंचायत' ते जेव्हा वाचतील तेव्हाच
ते टाकून देतील पाठीवरचा लाजेचा बोजा दूरवर
आणि उतरतील 'नरक सफाईच्या कार्यात.
त्यांना स्वच्छ सांगा की प्रत्येकाने
'कार्यरत', व्हायलाच पाहिजे असं नसतं.
'संकल्प' वाचूनही येतं भान चळवळीचं.
फक्त त्यासाठी 'विमुक्तायन' ही

वाचायला लागतं.
'तराळ अंतराळात' शिरून तळमळीनं.
या तळमळीतून ते 'कोणाची जात चोरायला'
लावण्याचं पातक करणार नाहीत.
'मजल दरमजल' करत त्यांच्या जीवनाचा प्रवास
होईल केवळ फक्त त्यांचाच. वाचन
नावाचा 'माझा प्रवास'
तेव्हा त्या प्रवासातच त्यांना कधी भेटेल 'तोतोचान'
तर कधी 'पश्चिमेचे पुत्र'
तर कधी 'सिसिफस' ची जीवघेणी धडपड.
'सारे प्रवासी घडीचे' हे ही त्यांना कळेल त्यातूनच.
आणि जेव्हा ते तुडवतील, 'कथांच्या पाऊलवाटा'
तेव्हा त्यांना 'पाडस' मधल्या मुलाचा
कलासक्तपणा ही शिकवायला हवा.
तसं त्यांनी स्वीकारायला हवं 'जंगलाचं देणं.'
'कोवळी उन्हे' जशी त्यांच्या अंगावर पडायला हवीत,
तसं 'व्यक्ती आणि वल्ली' वाचून खळखळून
हसायला हवं त्यांनी.
चंदिंचा 'महाराष्ट्र' वाचून
खरा इतिहास स्फुरण पावून नाहायला हवा
तसं 'गतशतक शोधता शोधता'
'समाज स्पंदने' ही कळायला हवीत
त्यांना एकोणिसाव्या शतकातली.
फुले, आंबेडकर वाचून त्यांच्या आयुष्याचं चरित्र
निर्माण करायला जसं ते शिकतील,
तसंच ते शिकतील 'वडीलधाऱ्या' माणसांचा
आदर करायला.
माझ्या प्रिय पालकांनो,
शिक्षकांनो आणि ग्रंथपालांनो,
द्या त्यांना नजर विज्ञानाच्या दृष्टीची
तेव्हाच त्यांचं नातं जडेल आकाशाशी
आणि मातीशी ही.
अपयशातून होतात अंधश्रद्धेचे बळी
म्हणून कडक नजर ठेवा त्यांच्या वाचनावर
त्यांना आवर्जून सांगा -
कथा-कादंबऱ्या नसतात केवळ मनोरंजनासाठी,
तर त्या असतात,
जीवनातले संघर्ष समजून घेण्यासाठी.
माणसामाणसांतले संबंध उकलून दाखविण्यासाठी.
अशा कथा-कादंबऱ्या ते जेव्हा वाचतील
तेव्हा ते बाहेर पडतील आपल्या 'कोसला' तून
त्यांच्या मनातला 'पारवा' गाऊ लागेल,
तेव्हा त्यांचा 'प्रवासी पक्षी
स्वतःच्या आयुष्याची 'सनद' जाहीर करेल
'नक्षत्रांचे देणं' दिल्यासारखी.
त्यांच्या मनातला 'भटका पक्षी' वसू दे
पुस्तकांच्या ओळी-ओळींवर,
मग तेच 'अक्षर संगती'त गात राहतील
आयुष्यभर.
'परि तैसे हे नोहेचि देवा
देखिला अक्षरांचा मेळावा
आणि विस्मयाचिया जीवा
विस्मयो जाला !'
पुस्तकं हे सर्व शिकवतील त्यांना
पण त्याआधी पुस्तकं न्या तुम्ही त्यांच्यापर्यंत
किंवा त्यांना पुस्तकांपर्यंत.
खरंच, शिकवा त्यांना पुस्तकांचं महत्त्व
खरचं सांगतो सर, ती फारच
वाचन-उत्सुक गोड मुलं आहेत.

**प्रा. प्रदीप कर्णिक**
ग्रंथपाल, रुपारेल महाविद्यालय

हे मासिक प्रकाशक आणि संपादक श्री. अरुणकुमार दिवू व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परमेश्वर प्रिंटर्स, ठाणे-४०० ६०२ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णुनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.